परस्परं भावयन्तः
मप्र

मराठे प्रतिष्ठान मुंबई यांचे मुखपत्र

# हितगुज

अंक ८३ ✦ संपादिका : डॉ. सौ. सुमेधा प्रभाकर मराठे (पृष्ठ १२०) ✦ सप्टेंबर, २०१०

वेबसाईट : www.marathepratishthan.org ✦ ई मेल : maratheparivar@yahoo.co.in

(फक्त खाजगी वितरणासाठी)

## संपादकीय



प्रिय कुलबांधवांना आणि भगिनींना माझा सप्रेम नमस्कार. वरूण राजाच्या आगमनाबरोबर उन्हाळ्याचा कडाका संपवून वर्षाराणी बरसत आहे. सृष्टी नटली आहे. हर्ष मानसी अशा प्रसन्न वातावरणात सुखकर्ता-दु:खहर्ता गणेश घराघरात विराजमान झाला आहे. पूजा-मंगल आरत्या, वाद्यांचा गजर अशा आनंदी, उत्साही, पवित्र वातावरणात आपले मराठे प्रतिष्ठानचे मुखपत्र ‘हितगुज’ प्रकाशित होत आहे.

या अंकात जपानवरील श्री. अ. द. मराठे यांचा लेख. तिस्क, उसगावचे श्री. गोविंदराव मराठे यांनी ‘परोपकारी अक्का’ लेखातून त्यांच्या बहिणीला वाहिलेली श्रद्धांजली, सदानंद मराठे यांनी ‘आजन्म ऋणी’ मधून त्यांच्या आईबद्दल व्यक्त केलेल्या भावना, सावरकरांनी मारलेल्या उडीची शताब्दी म्हणून ‘सावरकरांचा मार्सेलिस पराक्रम’ पुस्तक परीक्षण, भ्रष्टाचाराचे विदारक दर्शन देणारी ‘लाचेची वाटचाल’ ही कविता व आनंदराव मराठे यांच्या यशस्वी कारकिर्दीची वाटचाल (गोष्ट एका सोनेरी कुटुंबाची) हा लेख, ‘झडती’ आणि ‘उगवता तारा’ या वास्तवदर्शी कथा, श्रीनिवास कृ. मराठे यांची गणेशभक्तीत रंगलेली कविता, मराठे कुळातील व्यावसायिकांसाठी काढण्यात येणाऱ्या पुस्तिकेचे आवाहन अशा अनेक अन्य वैविध्यपूर्ण साहित्याने ‘हितगुज’ अंक सजला आहे. एसीपी विलास मराठे यांना राष्ट्रपती पदक प्राप्त झाले, त्यांच्या शौर्यगाथेला समस्त मराठे परिवाराचा प्रणाम! असो.

आपल्या मराठे परिवाराला श्री गणेश सद्बुद्धी, ऐश्वर्यसंपन्न, सुखी, समाधानी, श्रद्धायुक्त जीवन देईल अशी प्रार्थना सुखकर्त्या, दु:खहर्त्या मंगलमूर्ती गणपतीला करू या.

- आपली शुभचिंतक

**डॉ.सौ.सुमेधा प्र. मराठे, (पृ.१२०)**

८/१३, सहकार नगर, वडाळा,

मुंबई ४०० ०३१

दूरध्वनी : ०२२-२४१५०८८९

दिनांक : ३ सप्टेंबर, २०१०

## हार्दिक अभिनंदन!

श्री. सी. गो. खांबेटे (पृ. ६७६) यांनी श्री. सुनील गोडसे यांनी प्रकाशित केलेल्या, ‘साईबाबांच्या जन्माचे रहस्य’ (कादंबरी) या पुस्तकाची उत्कृष्ट संगणकीय मांडणी केली म्हणून दिनांक ७ ऑगस्ट २०१० ला माहीम येथील लक्ष्मी नारायण बाग सभागृहात झालेल्या भव्य प्रकाशन समारंभात, भारताचार्य सु. ग. शेवडे यांच्या हस्ते शाल, श्रीफल, देऊन **श्री. सी. गो. खांबेटे** यांचा सत्कार केला गेला.

मराठे प्रतिष्ठानद्वारा श्री. सी. गो. खांबेटे यांचे हार्दिक अभिनंदन!

◉ संपादिका : डॉ.सौ.सुमेधा प्रभाकर मराठे : ८/१३, सहकारनगर, वडाळा (पू.), मुंबई-४०००३१ ◉

दूरध्वनी : २४१५०८८९ ◆ ई-मेल : prabhakar_marathe@yahoo.com

◆ अक्षरजुळणी : सौ. अनघा विवेक मराठे, ठाणे. फोन : ९८३३१११९०२ ◆

# गोष्ट एका सोनेरी कुटुंबाची

**मुलांमध्ये उत्तम (परंतु वहिवाटीच्या) करिअर्सची क्षमता असतानाही हव्या त्या छंदामध्येच करिअर करण्यासाठी मुलांना उद्युक्त करणाऱ्या आणि ही परंपरा केवळ एका पिढीपुरतीच नव्हे, तर तब्बल तीन पिढ्यांपासून जोपासणाऱ्या पालकांची कथा सांगताहेत क्षमा पालकर**

ही गोष्ट आहे ठाण्यातील प्रसिद्ध सुवर्णकार मराठे कुटुंबाची. गेल्या तीन पिढ्या या व्यवसायात हे कुटुंब आहे. स्व. यशवंतराव मराठे हे आई-वडिलांचे छत्र लहानपणीच हरवल्याने बेळगावला लहानाचे मोठे झाले. अकरावी पास झाल्यावर स्वतःचा चरितार्थ चालवण्यासाठी मोठ्या भावाकडे ठाण्याला आले. सुरुवातीला बारीकसारीक उद्योग ते करत होते. लवकरच त्यांना ठाण्यातल्या देशपांडे सराफांच्या दुकानात नोकरी मिळाली.

त्यांचे कामातले कसब व इमानदारी पाहून हळूहळू लोकांनी त्यांना स्वतंत्रपणे काम द्यायला सुरुवात केली. हे करत असतानाच त्यांची एका मोत्याच्या व्यापाऱ्याशी ओळख झाली. मग यशवतंरावांचा एकीकडे दागिने घडविणे व दुसरीकडे मोत्याचे दागिने विकणे असा दुहेरी व्यवसाय सुरू झाला. १९४० साली दागिने घेऊन गावोगाव फिरणं थांबलं. कारण त्यांनी जागा घेऊन स्वतःचं दुकान थाटलं.

यशवंतरावांबद्दल सांगताना त्यांचे मोठे चिरंजीव आनंद मराठे सांगत होते की व्यवसायात अनेक अडचणींना यशवंतरावांना तोंड द्यावे लागले. पण हे करत असतानाच त्याचे पडसाद कुटुंबातील वातावरणात कधीच दिसले नाहीत. अर्थात या सगळया गोष्टीत त्यांच्या पत्नी स्व. सुधाताईंची त्यांना उत्तम साथ होती.

त्या काळातही वडिलांना जरा मोकळा वेळ मिळाला तर ते सर्व मुलांना व नातेवाईकांना घेऊन मुंबईला मेट्रोला सिनेमा बघायला, अनेकविध कार्यक्रमांना घेऊन जात. या अशा कार्यक्रमांना जाताना विविध विषयांवरच्या गप्पांची एक वेगळी मेजावनीच असायची. त्यात कधी वादविवाद, चित्रपटांवरच्या चर्चा, पुस्तकावरच्या चर्चा इत्यादी विषयांची रेलचेल असायची. पण हेच बाबा दुकानात मात्र वेगळे भासायचे. कधी काळी आम्ही भावंडं दुकानात गेलो तर त्यांच्या सहकाऱ्यांकडून खास वागणूक दिली गेलेली त्यांना पसंत नसे.

व्यवसाय म्हटला की त्यात चढ-उतार आलेच. यशवंतरावांनाही त्याचा सामना करायची वेळ आलीच. दुकानावर पडलेला दरोडा, गांधी हत्येनंतर लोकांमध्ये निर्माण झालेला प्रक्षोभ या आणि अशा अनेक कारणांनी आलेली आर्थिक संकटे जाणवायला लागली. मोठ्या मुलाने घराला हातभार लावावा म्हणून सायन्समध्ये पदवीधर झालेल्या आनंदला त्यांनी नोकरी धरायला सांगितली. आनंदरावांची हुशारी पाहून त्यांना टेक्सन कंपनीत दुसऱ्या क्रमांकाच्या पदावर काम करण्याची संधी मिळाली.

**(पान नं. २३ पहा.)**

# जपान आमचा व्याही

श्री. अ. दा. मराठे

आम्ही जपानला गेलो ते पर्यटक म्हणून नव्हे तर आमची मुलगी ऋतावरी तिथे आहे म्हणून. ती संस्कृतची एम.ए. आहे. मात्र ती शिकत असतानाच पंतप्रधान विश्वनाथ प्रताप सिंह यांनी जातियतेचे चक्र उलट फिरवले! त्यावर ऋता म्हणाली, ''बाबा, मी संस्कृत घेऊन एम.ए.पर्यंत शिकेन; पण मला नोकरी मिळणे शक्य नाही. तेव्हा मी त्याच्या जोडीला एखादी परदेशी भाषा शिकते. मी जपानी शिकू का? कारण ती अत्यंत अवघड भाषा आहे.'' आमची हरकत असण्याचे कारणच नव्हते. मात्र त्या काळात जपानी शिकण्याची सोय फक्त मुंबईतच होती. अत्यंत जिद्दीने तिने त्या भाषेवर प्रभुत्व मिळवले आणि तिच्या महत्त्वाकांक्षेप्रमाणे ती जपानीची इंटरप्रिटर म्हणून जपानला गेली. तिथे कोइचिरो ओनो या तरुणाच्या प्रेमात पडली. आमच्या मुलींच्या निर्णयशक्तीवर आमचा पूर्ण विश्वास आहे. आम्ही कसलाही विरोध न करता डोंबिवलीत त्यांचे वैदिक पद्धतीने लग्न लावून दिले. कोइचिरो (त्याच्या को इचि रो नावाचा अर्थ यशाचा दिवस दाखवणारा) जपानी बौद्ध धर्मीय आहे.

एकूण सोळा तासांच्या प्रवासानंतर आम्ही तोक्योच्या नरिता विमानतळावर उतरलो. तिथून नुमाझु या तिच्या गावी ऋता आम्हाला बसने घेऊन गेली. आम्ही गेलो तेव्हा रात्रीचे अकरा वाजून गेले होते. आमचे व्याही श्री. योशिहिको आणि विहीण सौ. केइको आमची वाट बघत होते. त्यांचे घर आणि ऋताचे बिऱ्हाड यांच्यात फक्त तीस फूट रुंद रस्ता होता. आम्ही घरात जाऊन स्थिरस्थावर होईतो ती दोघे आली. त्यांच्या पद्धतीने वज्रासनात बसली. नंतर जमिनीवर दोन्ही हातांची फुली करून त्यावर डोके ठेवून म्हणाली, ''तुम्ही लग्नासाठी आम्हाला आग्रहाने बोलावले, पण आम्ही येऊ शकलो नाही याबद्दल क्षमा करा.'' मग वर उठून विचारले, ''ऋता, यांच्या जेवणाची काय सोय केली आहेस? मी येताना उकडलेले बटाटे घेऊन आणले आहेत. पटकन काहीतरी करून देऊ या.'' अर्थात हे सर्व जपानीतून चालले होते आणि ऋता आम्हाला ते सर्व मराठीत सांगत होती. पुढे आमच्या पूर्ण वास्तव्यात हे असेच चालू होते. इंग्रजी बोलणारा कोणीच तिथे भेटला नाही. तिथले दैनंदिन व्यवहार फक्त जपानीतच चालतात. ऋताच आमच्यावतीने सर्वत्र व्यवहार करत होती. दुसऱ्या दिवशी कोईचिरोचा भाऊ ताकात्सुगु आणि बहीण मिचिको आम्हाला भेटायला आली. ती दोघेही लग्नाला आली होती. पुढच्या भेटीत प्रत्येकजण कपडे भेट देत होते. इथे लग्न झाले तेव्हा मिचिको साडी नेसून करवली म्हणून मिरवत होती. कोईचिरो आणि ताकात्सुगु शेरवानीत मिरवत होते. नाजूक दिसणारी मिचिको ट्रक ड्रायव्हर म्हणून नोकरी करते. मात्र स्वत:च्या गाडीने कार्यालयात जाते. ताकात्सुगु दोन छोट्या नोकऱ्या करीत होता त्यासाठी तो बारा तास घराबाहेर असे.

सौ. केईको या चीनमधून हकालपट्टी झालेल्या जपानी निर्वासित होत्या. त्यांचे आईवडील बोटीतून जपानला येत होते त्यावेळी वडील मरण पावले. पुढे दारिद्र्य, उपासमार यात आई आणि मुलगी वाचल्या. आईने अनेक हालअपेष्टा काढून मुलीला मोठी केली. लग्नानंतर योशिहिको-केईको यांनी आपल्या मोठ्या घरात हॉटेल काढले. योशिहिको पदार्थ बनवित आणि केईको ग्राहकसेवेकडे बघत. त्यांना प्रथम पुत्र कोईचिरोकडे लक्ष देता येत नव्हते त्यामुळे तो आपली आत्या एत्सुको कुबोतानकडे असे. या आत्याबाईंवरही अकाली पतीनिधन आणि अपत्यनिधनाचे संकट कोसळले. त्यांच्या एकाकीपणात कोईचिरोच त्यांचा मुलगा बनला आणि त्या दोघांमधले ते नाते अद्यापही आहे. (आत्याबाई वृद्धत्वाने अलीकडेच गेल्या.)

आम्ही तिकडे जाताना या मंडळींना देण्यासाठी म्हैसूरचंदन साबणाच्या वड्या आणि पंढरपूरची डेक्कन क्वीन उदबत्ती नेली होती. सगळ्यांना या गोष्टी इतक्या आवडल्या की त्यांनी येऊन आम्हाला सांगितले, ''साबण एकदा वापरला आणि उदबत्ती एक लावून बघितली आणि दोन्ही ताबडतोब ट्रंकेत टाकून ठेवल्या. सणासुदीलाच त्या बाहेर काढणार!

योशिहिको अगदी साधे आणि सरळ गृहस्थ आहेत. थोडे भावुकसुद्धा वाटले. ऋता त्यांची इतकी आवडती आहे की प्रवासात त्यांना ऋताच शेजारी हवी असते. केईको बाई साळढाळ स्वभावाच्या, बोलक्या आणि थोड्या बिनधास्तही वाटल्या. त्या ऑर्केस्ट्रामध्ये एक वाद्य वाजवायला जातात. सायकलवर टांग टाकून कापडांच्या दुकानात जातात. कटपीस आणून त्यांचे सुंदर बटवे शिवतात. गिऱ्हाईक मिळाले तर विकतात किंवा भेट म्हणून देतात. मला त्यांनी एक बटवा दिला. (कोईचिरोला तर बटव्यांचे वेड आहे. त्याच्या बॅगेत दोन-चार तरी बटवे असतात.) आमच्या वास्तव्यात आम्ही ऋतासाठी तिकडे नेलेले शेंगदाणे भाजून ठेवले होते. केइकोबाई आल्या. त्यांनी ''काय आहे?'' विचारून दोन दाणे खाऊन बघितले. आणि पुढे बोलता-बोलता थोडे थोडे तोंडात टाकायला सुरुवात केली. मग पटकन ऋताला म्हणाल्या, ''काय ग हावरट बाई आहे मी. अर्धे दाणे मीच फस्त केले.''

आमच्या जपान दर्शनाची सुरुवात क्योतो येथील प्राचीन बुद्धमंदिरे, राजवाडे, किल्ले यांच्यापासून झाली. इथला प्रसिद्ध क्योतो टॉवर एक किलोमीटर उंच आहे. त्याच्यावर लिफ्टने जाता येते. तिथून खूप दूरचा भाग दुर्बिणीतून पैसे देऊन पाहता येतो. आम्ही फक्त डोळ्यांनी दिसणाराच भाग बघितला. तो बघताना ट्रॅफिक जॅमिंग ही किती मामुली समस्या आहे हे दिसते. एक कुठले तरी वाहन थोडे इकडून तिकडे होते आणि मागे गाड्यांची माळ तयार होते. त्या एका वाहनाला जरा आधीच जागा करून दिली तर जॅमिंग नक्कीच होणार नाही. पण आपल्याला पश्चात्ताप नेहमी नंतर होतो. पश्चात्ताप आधीच झाला तर माणसाची दु:खं नव्वद टक्क्यांनी

कमी नाही का होणार? अर्थात टॉवरवरून जमिनीवर येईपर्यंतच हा विचार टिकला.

क्योतोला आम्ही सुप्रसिद्ध बुलेट ट्रेनने गेलो. ती गाडी प्लॅटफॉर्मवर येतानासुद्धा वेगात असते. त्यामुळे प्लॅटफॉर्मवर प्रवासी रेलिंगबाहेर उभे राहतात. गाडीचे दरवाजे प्लॅटफॉमवर जाण्यासाठी रेलिंगमध्ये जी दारे असतात तिथेच नेमके येतात. त्यामुळे धावपळ, रेटारेटी अजिबात नाही.

गाडीत बसल्यावर वेग जाणवत नाही. मात्र मला जाणवले ते असे की आपल्या वेगवान गाड्यांमधून जाताना गाडीच्या डावीउजवीकडचा जवळचाच भाग मागे धावताना जाणवतो. या गाडीतून खूप दूरपर्यंतचा भाग धावत जात आहे असे दिसते. मार्गाला वळण आले की दूरचा भाग गोल गोल फिरत जवळ येतो आहे असे वाटते. विरुद्ध दिशेने येणारी बुलेट जवळ आली की खट् असा आवाज होत आपली गाडी थोडी उचलल्यासारखी वाटते.

गाडी स्टेशनवर येऊन थांबते आणि दारे उघडतात तोच टी.सी. हजर होतो. तिकिटे बघून प्रवाशांना आत घेतो. प्रवासात जाताना किंवा येताना एकदाच फळांचा रस दिला जातो. तीन प्रकारातून तो निवडायचा असतो. रस कृत्रिम असतो. गाडी ज्या दिशेने जाते त्याच दिशेकडे तोंड करून प्रवास होतो. शेवटच्या स्टेशनवर खुर्च्यांची दिशा बदलतात.

जगात भारत हा एकमेव देश शाकाहारी आहे. इथे मांस, मासे खाणारे हे पदार्थ दररोज खात नाहीत. चातुर्मास पाळतात. म्हणजे तेसुद्धा भारताबाहेरच्या दृष्टीने शाकाहारीच. जपानमध्ये भात, मासे आणि मांस हाच खरा आहार. भाज्यांचा उपयोग मांसातच घालायला होतो. मात्र देवक ठेवणे इ. धार्मिक कार्यांच्या काळात ते वर्ज्य होते. ऋताने पाहुण्यांना ते समजावून सांगितले आणि त्यांनी ते कसलेही आढेवेढे न घेता स्वीकारले. सूर्या फुलके करत असताना मिचिको आणि ताकात्सुगु यांनी बघितले. गॅसवर ठेवल्यावर फुलका फुगला हे बघून दोघेही आश्चर्याने नाचायला लागली. लगेच त्यांनी आपले कॅमेरे आणले आणि शूटिंग केले. त्यांना मांसाचा रस्सा आणि पोळी दिले की ते पोळी नुसतीच खात आणि रस्सासुद्धा नुसताच भुरकीत. एकदा सूर्याने त्यांना पोळी आमरसात बुडवून कशी खायची ते दाखवले. ते त्यांना इतके आवडले की ते रोजच आमरस पोळी खायला लागले आणि मांसहार पूर्ण विसरले. त्यांना तुपाचा वास मात्र मुळीच आवडला नाही. (त्यांना माशांचा वासच बरा वाटला.)

आम्ही दोघेही मांसाहाराचे आंबट शौकीन नाहीत तसे समोर आला तर त्याज्य मानणारे नाही. त्यामुळेच तीन त्रिकाळ मांसाहार खायला जपानमध्ये आम्हाला मुळीच जड गेले नाही. दुपारच्या वेळी कोईचिरो घरी जेवायला नसे. मग ऋता आईच्या हातचे भारतीय जेवण जेवत असे. कोईचिरोला शेवपुरी, तिखटरहित बटाटेवडे असे काही पदार्थ आवडतात. मग सासूबाई जावयाला ते बनवून देत. पुऱ्या इकडूनच नेल्या होत्या. इथे तिखट हा पदार्थच नाही. इथल्या मिरच्या जराही तिखट नसतात. आपण त्या दहा मिरच्या एकावेळी सहज खाऊ.

तांदूळ मुख्य उत्पन्न असल्याने इथे तांदुळाच्या पिठाची उकड काढून त्याचे अगदी आपल्याकडच्या मोदकांसारखे मोदक-निकुमान बनवतात. मात्र आत गोड पुरण नसते तर डुकराच्या मांसाचा (पोर्क) खिमा असतो. मोदकाबरोबर उकडीच्या करंज्या - ग्योझा - असतात. त्यातही हाच खिमा असतो. जाणकारांना माहीतच आहे की डुकराचे मांस अत्यंत चवदार असते. योकोहामा येथील हॉटेलमध्ये तर आपल्याकडच्या कलाकार सुगरणींच्या मोदकांसारखे एकविस पाकळ्यांचे मोदक मिळतात. तांदुळाच्या पिठाचे अप्पे - ताको याकी - असतात. एका वेळी ५० ते ६० अप्पे होतील एवढे भव्य चौकोनी अप्पेपात्र असते. एका काडीने भराभरा अप्पे उलथत जातात. अप्प्यांमध्ये छोट्या ऑक्टोपसचा तुकडा असतो. हे सर्व पदार्थ चविष्ट असतात.

जपानी लोकांचे जेवण भात आणि मासे हेच आहे. तिथले तांदूळ वेगळे आहेत. भाताचे एकेक शीत चुरमुऱ्याएवढे असते. भात चिकट होतो. त्याचे गोळे बनवतात आणि त्यावर माशाचा तुकडा, मांसाचा तुकडा असे काही काही ठेवून तो घास 'हशी' नावाच्या दोन काड्यांनी उचलून तोंडात टाकतात.

आम्हाला सर्वजण विचारतात, ''ऋता तिकडे किमोनो घालून वावरते का?'' याचं उत्तर असं आहे, ''महाराष्ट्रातल्या एकूण एक बायका दररोज पैठणी नेसून फिरतात का?'' किमोनो अस्सल पैठणीपेक्षा किमान पाचपट महाग आहे. तिथे तो कोणाला हवं तर भाड्याने मिळतो. फक्त लग्नात वधूचा पांढरा किमोनो घेतात; पण तो सुद्धा भाड्यानेच! क्योतो हे प्राचीन देवळांचे गाव आहे. तिथे आम्हाला फक्त तीन तरुण मुली किमोनोत दिसल्या. अर्थात ते किमोनो सेमी पैठणीसारखे (आणि बहुधा भाड्याचे) होते. बाकी सर्वांचा पोशाख जीन आणि टॉप. तो पोशाख सौ. केईकोपासून ऋतापर्यंत सर्व वापरतात.

बौद्ध मंडळींच्या घरात बुद्धाची मूर्ती असते. हे देवघर स्वतंत्र असते. मूर्तीची फुले वाहून कुठेही पूजा होत नाही. केवळ जपानी उदबत्ती लावून पूजा होते. पूजेपूर्वी अंघोळ करण्याची अट नाही की पूजेची वेळही ठरलेली नाही. बुद्धाला नैवेद्य अर्थातच मांसाचा असतो. सार्वजनिक देवळांमध्ये नैवेद्य म्हणून दारूच्या बाटल्याही दिसल्या. धंद्याला बरकत आल्याचा आनंद म्हणून त्या बुद्धार्पण केलेल्या असतात. (मात्र इथे 'तीर्थप्रसादाची' सोय नाही याचे मला वाईट वाटले.) साधारणत: नात्यातल्या माणसाच्या घरी गेल्यावर बुद्धापुढे उदबत्ती लावण्याची पद्धत आहे. समोर ठेवलेल्या उदबत्तीचे मधोमध दोन तुकडे करायचे. ते दिव्यावर किंवा काडेपेटीने पेटवायचे आणि त्यांना आलेली ज्योत हवेत हलवूनच मालवायची; फुंकर मारून विझवायची नाही.

जपानी लोकांची एक प्रथा अशी आहे - एखाद्या व्यक्तीला मुलीच आहेत आणि मुलगा नाही; तर एक जावई सासऱ्याचे आडनाव घेऊन त्याचा वंश पुढे चालू ठेवतो. मात्र तो जावई आईवडिलांचा ज्येष्ठ पुत्र असता कामा नये. कोईचिरो ज्येष्ठ पुत्र आहे. तो ज्येष्ठ पुत्र नसता तर त्याने लग्नानंतर कोईचिरो मराठे असे नाव लावले असते आणि मराठे कुलवृत्तांतात जपानी मराठे शाखेची भर पडली असती! एक मात्र आहे - भारतात त्याला कोणी नाव विचारले की तो कोईचिरो अश्विनीकुमार मराठे असे ठोकून देतो.

जपानमध्ये मृताचे दहन करण्याची पद्धत असते. दहनानंतर ठराविक दिवशी अस्थी घरी आणतात. प्रत्येक घराण्याचे स्मारांकासाठी राखलेल्या जागी ठराविक पद्धतीचे एक प्रतीक - ओहाका - असते. ते घराण्याचा मूळ पुरुष, त्याचे घर अशा प्रतीकांचे असते. या ओहाकाखाली ज्येष्ठ पुत्राच्या हस्ते अस्थी सुरईत ठेवतात.

घरात काही कार्य असले की किंवा कधीही घरातली माणसे तिथे जातात आणि एका लाकडी डवलीने स्मारकावर पाणी ओततात. योशिहिको आम्हाला तिथे घेऊन गेले आणि आम्ही ओनो घराण्यातील सर्व मृतांना जलांजली वाहिली. आता पुन्हा लवकरच जाऊ तेव्हा आम्ही योशिहिकोंना जलांजली देऊ. त्यांच्या अस्थी तिथे पोहोचल्या आहेत.

जपानी लोक घुबडाला - फुकुरो - सुखकर्ता, दु:खहर्ता मानतात. त्यामुळे महाराष्ट्रात गणपतीला जे स्थान आहे ते तिथे घुबडाला आहे. घरोघरी, दुकानात, हॉटेल्समध्ये घुबडाच्या मूर्ती, चित्रे असणारच. त्यानंतर मान आहे तो मांजराचा. मांजर -नेको - घरात आनंद, आरोग्य आणते. त्याचे चित्र किंवा मूर्ती मागील दोन पायांवर उभ्या अवस्थेत एक 'हात' वर करून असते.

आपल्याकडच्या देवळाच्या जशा पालख्या निघतात तशा तिथेसुद्धा निघतात. स्त्री-पुरुष एकत्रितपणे पालखी खांद्यावर घेऊन मिरवून आणतात. ते करताना रस्ता अडवून आपली 'पावर' दाखवायची वृत्ती आपल्यासारखीच. मात्र रहादारीपोलीस वाहतूक अन्य रस्त्याने वळवून वाहनांची सोयही चांगली करतात. वाहनांना ५ ते ७ मिनिटांपेक्षा अधिक थांबावे लागत नाही. देवळासमोरच्या रस्त्यावर अनेक प्रकारची दुकाने लावली जातात. ऋताच्या घरापासून जवळच्या बुद्धमंदिरात जत्रा भरली होती. आम्ही तिथे गेलो. लाऊडस्पीकर होता; पण जगाला उपद्रव होईल असा नव्हता. सांस्कृतिक कार्यक्रमांमध्ये ढोलवादन होते. ते श्रवणीय आणि प्रेक्षणीय होते. वादकाने उजवा हात वर केला आणि डाव्या हातातील काठीने दोन्ही बाजूंवर अत्यंत चपळाईने आघात करत, लय-ताल पूर्वीचेच ठेवत असं वाजवलं की सर्वांनी टाळ्या वाजवून दाद दिली. त्याच्या हातात खरंच वीज संचारल्यासारखी वाटली.

जपान्यांचे दात फार खराब असतात. आपल्या टीव्हीमध्ये दिसणाऱ्या प्रत्येक भारतीयांचे दात पांढरेशुभ्र आणि चमकदार असतात. तिथले चित्र अगदी उलट! तरुण मुलींमध्ये सिगरेट ओढण्याचे प्रमाण अधिक वाटले. कार्यालयातून घरी जाता जाता बिअर पिऊन जाणाऱ्या मुली खूप दिसल्या. रेल्वेगाडीत धूम्रपानाला बंदी आहे. प्लॅटफॉर्मवर मात्र आपल्याकडील देवळात पैसे टाकायला दानपेटी असते तशी लोखंडी गज लावलेली आणि आता पाणी असलेली पेटी असते. सर्व 'फुक्ये' तिच्याभोवती जमून फुंकतात, राख आणि थोटकं त्या पेटीत टाकतात आणि निघून जातात.

आम्ही दोघंच सायंकाळी फिरून येत असू. रस्ते सरळ आणि समांतर असली भीती नव्हती. तशातच ऋताने 'रस्ता चुकल्यास माझ्या आईबाबांना कृपया खालील पत्त्यावर पोहोचवावे.' अशी जपानीत चिठ्ठी लिहून दिली होती. आमच्या पोशाखाकडे सर्वजण अत्यंत कोऱ्या चेहऱ्याने बघत आणि पुढे जात. कोणी कधी हसले नाही की चेहऱ्यावर कुतूहल दाखवले नाही. मात्र ती चिठ्ठी दाखवली असती तर अगदी घरापर्यंत आणून सोडले असते.

जपानी माणूस म्हटल्यावर आपल्यापुढे ठेंगू आणि बारीक डोळ्यांची व्यक्ती उभी राहते. वास्तव मात्र तसे नाही. कोइचिरो चांगला उंच आहे. अनेक उंच आणि आपल्यासारखे डोळे असलेले सतत दिसत होते. अनेक जपानी माणसे अशी दिसली की त्यांना अण्णा, तात्या, दादा, काका अशा नावाने हाक मारावी. काळा सावळा जपानी मात्र मला दिसला नाही.

ऋताचे डोळे माझ्या वळणावर गेलेले बारीक आहेत. वर्ण मोदकाच्या उकडीसारखा गोरा आहे. जपानी ती इतकं सफाईदार आणि जपानी उच्चारात बोलते की ती भारतीय आहे याची कोणाला जाणीवच होत नाही. आणि इकडे आल्यावर ती इतकं व्यवस्थित मराठी बोलते की ती महिनोन् महिने चोवीस तास जपानी बोलत असेल असे कोणाला वाटणार नाही. एकदा तिच्या बरोबर आम्ही बाहेर गेलो होतो. येताना ती दूध आणायला तिच्या नेहमीच्या दुकानात गेली. आमच्या पोशाखाकडे बघून विक्रेतीने 'हे कोण?' असे विचारले. ऋता माझ्याकडे बोट दाखवत म्हणाली, 'ओतोसान' (वडील) नंतर सूर्याकडे बोट दाखवत म्हणाली, 'ओकासान' (आई) त्यावर ती विक्रेती म्हणाली, ''मी तुला जपानीच समजत होते.''

जपानीत वडिलांना ओतोसान म्हणतात, तर आईला ओकासान म्हणतात. आता ही नावं लक्षात कशी ठेवणार? यावर मी तोडगा काढला, 'ओता थोडी अजून' म्हणतो तो बाप आणि 'ओकाल एवढी ढोसून' म्हणते ती आई! सान म्हणजे वडिलधारी व्यक्ती आणि चान म्हणजे वयाने लहान, चिरंजीव. कोइचिरोला आम्ही कोचान म्हणतो. ताचान म्हणजे ताकात्सुगु आणि मिचान म्हणजे मिचिको. भारताला 'इंदो' म्हणतात. एकदा ओकासान सूर्याबाईंच्या मनात जावई कोचानला बटाटेवडे करून सरप्राईज द्यावंसं वाटलं. आम्ही दोघंच बाहेर पडलो आणि एका दुकानात गेलो. सूर्याने हाताने आकार दाखवत 'पोटॅटो, पोटॅटो' असे म्हटले. दुकानदारबाई 'पतॅतो पतॅतो' करत आत गेल्या आणिक बटाटे घेऊन आल्या. आम्ही पाच हजार येन दिले. तिने मान हलवून 'झाला हिशेब' म्हटले. मग सूर्याने खुणा करीत म्हटले 'बाँबे' तशी ती म्हणाली 'इंदो'

आपले चाळीस रुपये म्हणजे साधारणत: शंभर येन. हा हिशोब करून आम्ही चाळीस हजार रुपयांचे एक लाख येन घेतले आणि भरपूर खरेदी करू असा बेत केला. मात्र तिथे गेल्यावर कळले वेलची केळ्याच्या आकाराचे कोळशाच्या शेगडीत भाजलेले रताळे शंभर येनला मिळते. टपरीतला अर्धाकप चहा हजार येन. यावर ऋता म्हणाली, ''तुम्ही असा हिशेब करीत राहिलात तर इथे उपाशी रहाल. आमचे पगार कोटीच्या घरात आहेत. आम्ही तुमचा इथला सर्व खर्च आरामात भागवू.'' माझ्या मनात मात्र आलं चाळीस हजार घेऊन आम्ही दोघं मुंबईला गेलो असतो तर अक्षरश: जिवाची मुंबई करून आलो असतो.

आमच्या घरापासून जवळ असलेल्या कानोगावा येथे योशिहिको आम्हाला घेऊन गेले. गावा म्हणजे नदी. नदीला घाट बांधलेला होता. सर्वत्र अत्यंत स्वच्छता होती. फुलबागा होत्या. तो दिवस ५ मे होता. त्यादिवशी पुत्रदिन होता. त्यामुळे जागोजागी मोठ्या आकाराचे आणि अनेक रंगांचे कापडी मासे हवेत फडकत होते. 'कोई' या नावाचे मासे आहेत. ते विशेषत: देवळाजवळच्या तळ्यात असतात. या जातीचे मासे धबधब्याच्या धारेतून वर चढत जातात. त्यांचा हा प्रवाहाविरुद्ध जाण्याचा, वर जाण्याचा गुण मुलग्यांमध्ये यावा म्हणून या दिवशी कोई माशाच्या आकाराच्या फुग्यासारख्या पोकळ आणि वरून माशाचे खवले, तोंड, डोळे रंगवलेल्या विविधरंगी प्रतिमा घरावर, अंगणांत लावतात. नदीवरील माशाच्या प्रतिमा एका अमेरिकन कंपनीने जाहिरातीसाठी लावल्या होत्या.

जपान हा बारमाही पावसाचा देश आहे. मात्र सर्वत्र दररोज पाऊस पडतोच असे नाही. कोणत्या भागात केव्हा पाऊस पडेल याचे अंदाज जाहीर होतात आणि ते खरेही ठरतात. या पावसामुळे सर्वत्र हिरवळ दिसते आणि धूळ जराही नाही. यामुळे आम्हा दोघांनाही तिथल्या मुक्कामात एकदाही सर्दी झाली नाही. भूकंप तिथे जवळजवळ रोज होतात. त्याचेही अंदाज वर्तवले जातात. आमच्या वास्तव्यात भूकंप झाले, पण आम्हाला ते जाणवलेच नाहीत. सध्याच्या जपानात अनेक मजली उंच इमारती आहेत; पण त्यांच्या भिंतींत पोलादाच्या बारीक तारा असतात. त्यामुळे सर्व इमारत मोठ्या भूकंपात हालेल, पण कोसळणार नाही. की जीवितहानी नाही. घराघरातून फर्निचर मात्र बसकट, वितभर उंच सोफ्यावर बसायचे; पण पाय ढोपरात दुमडून अर्धवट मांडी मात्र जमिनीवर घालायची. घरात प्रवेश केला की बूट, चपला एका विशिष्ट जागीच ठेवायच्या. फरशीवर केलेल्या लाकडी जमिनीवर फक्त सपाता वापरायच्या. देवघर, शेजघर यात फरशीवर चटया घातलेल्या असतात. तिथे मात्र अनवाणीच पाय ठेवायचा. आपण लहानपणी भूगोलाच्या पुस्तकात वाचले होते तशा सरकवून हव्या तशा खोल्या तयार करायच्या स्लायडिंग वॉल्स आता अत्यंत दुर्मीळ झाल्या आहेत.

भूकंप जेव्हा मोठा असतो तेव्हा घरातील सर्वांनी असेल त्या अवस्थेत भरभर घराबाहेर पडायचे आणि मोकळ्या मैदानात जायचे. अशी मैदाने जागोजाग आहेत. जाताना एकाने घरातली एक पिशवी पटकन उचलून घ्यायची. त्या पिशवीत पाण्यात टाकताच तयार होणारा भात, सूप पावडर, औषधं असं साहित्य असतं. आश्रयास गेलेल्या जागेत पुढची सोय असते. आपत्ती व्यवस्थापन चोख असते.

जपानला जाताना आम्ही भारताबद्दल घृणा मनात घेऊन गेलो नव्हतो. त्यामुळे आम्हाला जाणवले की हायवे, एस.टी. किंवा अन्य बससेवा अगदी रेल्वेसुद्धा उत्तम आहेत. मात्र या सेवा केवळ गर्दीमुळे कोलमडून जातात. आणि तिकडे गर्दीच नसल्याने सर्व वेळेवर आणि वेगाने होते. आपल्याकडे ती वेळ येईलच.

नुमाझु ते नरिता परतीच्या प्रवासासाठी आम्ही बसस्टॉपवर गेलो. योशिहिको आणि एत्सुको आत्या तिथवर सोडायला आले होते. निरोप देताना दोघांच्याही डोळ्यांत पाणी आले. कुठच्या टोकाची कुठची चार माणसं. पण नवं नातं जोडून एकत्र आली आणि त्यांचे परस्परांशी भावबंध जडले. दुर्दैवाने हा निरोप अखेरचाच ठरला. आम्ही पुन्हा जाऊ तेव्हा दोघांनाही जलांजलीच द्यायला जाऊ.


**- अश्विनीकुमार दत्तात्रेय मराठे,**
१० शांतिनाथ अपार्टमेंट,
१६८ यशवंत नगर, तळेगाव दाभाडे
जिल्हा पुणे - ४१० ५०७



**MARATHE, Suniti (Godawari) Eknath; B.A.; B.T**. - Passed away peacefully, on May 22, 2010 at 2:45 pm, in her 85th year, at the Niagara-on-the-Lake hospital. She was born at Wai, District Satara, Maharashtra State, India on June 22, 1925, daughter of the late Dr. Mahadeo Narayan and Janaki Daté. Dearly beloved wife of Dr. Eknath V. Marathé of St. Catharines, ON. Loving mother of Aruna Marathé (Gordon Banting), Calgary, Alberta and Sanjay Marathé of St. Catharines, ON. Loving grandmother of James Rajiv Banting and Janaki Catharine Banting of Calgary. She was predeceased by her sisters, Krishna (Dr. Balkrishna Gokhale, Aurangabad), Durga (Dr. Madhusudan Gadgil, Nasik) and Vijaya (Shri. Gajanan Sathaye, Pune). She leaves in India her brother Prof. Suresh (Manjiri) Daté of Puné and sisters Yamuna (Brig. Anand Apte, Ret.) of Secunderabad, and Ms. Sudha Daté of Nasik, and many nieces and nephews. She taught school in India and Canada. She enjoyed reading, sewing, hand and machine knitting, and especially cultivating and spending time in her vegetable and flower garden and fruit trees. She was a loving and well loved wife, mother, grandmother, sister, aunt, and friend. Funeral Arrangements have been entrusted to the GEORGE DARTE FUNERAL CHAPEL, (905) -937- 4444. A Private Family Service will take place. Cremation to follow. According to her wishes, please no flowers or sympathy cards or visitation. If desired, donations in her memory can be made to the Canadian Red Cross or the Canadian Arthritis Society.

**वैकुंठवासी ती. पिताश्री दामोदर हरि मराठे यांच्या पवित्र, प्रेमळ स्मृतीस अभिवादन**

श्री. प्रभाकर मराठे (पृ.१२०) ८/१३, सहकारनगर, वडाळा, मुंबई ४०० ०३१
सेल : ९८२०२३२०८२ दूरध्वनी : २४१५०८८९ई-मेल : **prabhakar_marathe@yahoo.com**




## पुस्तक परिचय श्री. दुर्गेश परूळकर लिखित : सावरकरांचा मार्सेलिस पराक्रम

**लेखक : दुर्गेश परूळकर समीक्षिका : डॉ.सौ.सुमेधा प्रभाकर मराठे (पृ.१२०)**

दिनांक ८ जुलै १९१० या दिवशी स्वातंत्र्यवीर सावरकरांना इंग्लंडमध्ये पकडून हिंदुस्थानात आणत असताना, फ्रान्सच्या दक्षिण किनाऱ्यावर मार्सेलिस बंदरात बोटीच्या खिडकीतून (पोर्टहोलमधून) भर समुद्रात उडी मारून, पोहत फ्रान्सचा किनारा गाठून इंग्रजांच्या कैदेतून निसटण्याचा अत्यंत धाडसी प्रयत्न स्वातंत्र्यवीर सावरकरांनी केला. त्यांच्या या साहसाला दिनांक ८ जुलै २०१० ला शंभर वर्षे पूर्ण झाली.

वीर महाबली हनुमानानंतर समुद्रउडी घेणारा वीर म्हणजे स्वातंत्र्यवीर विनायक दामोदर सावरकर. त्यांच्या या उडीच्या शताब्दीवर्षाचे औचित्य साधून श्री. दुर्गेश परूळकर यांनी 'सावरकरांचा मार्सेलिस पराक्रम' हे मराठी साहित्यातील पहिले पुस्तक लिहिले आहे.

**भव्य प्रकाशन सोहळा**

रविवार दिनांक ११ जुलै २०१० ला सायंकाळी ५.३०वाजता 'दादर-माटुंगा कल्चरल सेंटर'च्या सभागृहात, गार्गीज प्रकाशनाचे प्रकाशक दाम्पत्य सौ. संपदा व श्री. सुनील नाटेकर यांनी प्रेक्षकांच्या मोठ्या उपस्थितीत थाटामाटात भव्य प्रकाशन समारंभ साजरा केला.

श्री. विक्रमराव सावरकर, ज्येष्ठ राजकीय विचारवंत श्री. ज. द. जोगळेकर, विख्यात इतिहास संशोधक श्री. निनाद बेडेकर, डॉ. सच्चिदानंद शेवडे, माजी खासदार, सारस्वत बँकेचे अध्यक्ष श्री. एकनाथ ठाकूर इ. मान्यवर उपस्थित होते. माजी पेट्रोलियम मंत्री श्री. राम नाईक यांच्या हस्ते पुस्तक प्रकाशन झाले. कार्यक्रमाच्या प्रारंभी पार्श्वगायक श्री. चंद्रशेखर गाडगीळ यांनी सावरकरांची गीते सुश्राव्य सादर केली. श्रीधर फडके यांनी 'सागरा प्राण तळमळला' हे अजरामर गीत भावोत्कटतेने गायले. कार्यक्रमाचा समारोप श्री. सुनील नाटेकर यांनी राष्ट्रगीत 'जन गण मन' गायनाने केला.

लेखक श्री. दुर्गेश परूळकर हे हाडाचे शिक्षक आहेत. गणितासारखा कठीण वाटणारा विषय विद्यार्थ्यांना समजावून सांगण्यात ते यशस्वी ठरले आहेत. कट्टर हिंदुत्वनिष्ठ, अभ्यासू लेखक आणि उत्तम वक्ता म्हणून ते मान्यता पावलेले आहेत. आजपर्यंत ४००च्या वर व्याख्याने त्यांनी दिली आहेत. त्यांच्या व्यक्तित्वाचे वैशिष्ट्य म्हणजे स्वातंत्र्यवीर सावरकरांचे ते कृतीशील अनुयायी आहेत. हिंदुमहासभेचे पुढारी श्री. विक्रमराव सावरकर हे त्यांचे आदर्श आदरस्थान आहे. दादर येथील सावरकर राष्ट्रीय स्मारकाचे ते विश्वस्त आहेत.

**पुस्तकाचे अंतरंग**

'की घेतले व्रत न हे आम्ही अंधतेने । लब्ध प्रकाश इतिहास निसर्ग माने । जे दिव्य, दाहक म्हणोनि असावयाचे । बुध्याच वाण धरिले करी हे सतीचे ।' असा उद्घोष करणाऱ्या क्रांतीवीर बाबाराव, स्वातंत्र्यवीर तात्याराव आणि वीराग्रणी नारायणराव या तिघा क्रांतिकारक सावरकर बंधूंनी हिंदुस्थानच्या स्वातंत्र्यसंग्रामात, सशस्त्र क्रांतीच्या इतिहासात सुवर्णाक्षरांनी नोंद करून ठेवावे असे क्रांतीसंघटन कार्य केले आहे.

हिंदुस्थानचा स्वातंत्र्यलढा हे आपल्या देशाच्या इतिहासातील एक दैदिप्यमान पर्व होते. कारावास आणि वधस्तंभ ज्यांच्या वाट्याला आले अशा क्रांतिकारक महापुरुषांच्या गुप्त क्रांतीकार्याच्या लढाईचा सत्य इतिहास म्हणजे हे पुस्तक. समग्र सावरकर साहित्याचा सत्त्वांश म्हणजे हे पुस्तक. समग्र सावरकर साहित्याचे प्रचंड ग्रंथ वाचायला वेळ नसतो अशा वाचकांनाही हे पुस्तक वाचून सावरकरांचे चरित्र कार्य समजण्यास मदत होईल. या पुस्तक वाचनामुळे स्वातंत्र्यवीर सावरकरांची राजनीति,ध्येयधोरणे आणि तत्कालिन राजकारणाविषयीची त्यांची मते वाचकांना जाणून घेता येतील. क्रांतिकारकांच्या धगधगत्या मनातील खदखदता असंतोष या पुस्तकात पाहायला मिळेल.

मार्सेलिसचे समाजवादी महापौर जां. जोरे यांनी जर्मनीमध्ये स्टुटगार्ट शहरात आंतरराष्ट्रीय समाजवादी परिषदेचे अधिवेशन भरविले होते, त्याचे निमंत्रण मादाम कामा यांना दिले होते. त्यांनी या परिषदेत पहिल्यांदाच ''वंदे मातरम्'' राष्ट्रमंत्र असलेला हिंदुस्थानचा ध्वज फडकाविला. त्यावेळी सावरकरांनी त्याबाबत एक ठराव मांडून तो संमत करून घेतला. तो ठराव या पुस्तकात इंग्रजीत दिला आहे. पण लेखकाने त्याचे मराठीत भाषांतर केले आहे. हे स्तुत्य आहे, चांगले आहे. इतर लेखकांनीही याचे अनुकरण करावे. कारण इंग्रजी उतारा वाचावयाचा, त्यातील सर्व शब्दांचे अर्थ सर्वांना समजाततच असे नाही. पण मराठीत भाषांतर केले तर आशय आणि अर्थ स्पष्ट समजतो. या पुस्तकात अनेक ठिकाणी इंग्रजीत उतारे आले आहेत पण त्याचे मराठीकरण केल्यामुळे अडत नाही. लेखकाने 'भावार्थ' म्हणून मराठीत सांगितले आहे ही जमेची बाजू.

पुस्तकातील 'पहिल्या स्वातंत्र्यसमराचा सुवर्णमहोत्सव' या तिसऱ्या प्रकरणाची संवादरूपी सुरुवात आहे. त्यात नाट्यमयता आहे, रंगभूमीवर सादरीकरण करण्यास योग्य अशी नाट्यशैली आहे. तसेच काहीवेळा उपरोधाची भाषा पुस्तकात पाहायला मिळते. उदा. ''स्वतंत्र हिंदुस्थानात देशभक्तांचा तुरुंगात -बाहेर छळ केला जातो. साध्वी प्रज्ञासिंग आणि कर्नल पुरोहित यांसारख्या लोकांवर खोटेनाटे आरोप करून त्यांचा अतोनात छळ करण्यात आला. जगाच्या पाठीवर असा देशभक्तांचा छळ करणारा हिंदुस्थानाखेरीज अन्य

देश नाही. कसाबसारख्या नराधमाला बिर्याणीची ताटे नी प्रज्ञासिंगसारख्या साध्वीला कुजके नासके किडेमिश्रित अन्न दिले जाते. वा रे वा लोकशाही! (पृ.११०) लेखकाने या पुस्तकात अनेक ठिकाणी अशी उपरोध शैली वापरली आहे. क्रांतिकारक पित्याच्या हळुवार हृदयाचे, संवेदनाक्षम, तरल मनाचे उत्कट दर्शन 'प्रभाकरास' या कवितेत होते. (पृ.१२६) सावरकरांचा पहिला मुलगा प्रभाकर. हा चार वर्षांचा असताना देवी रोगाला बळी पडला. मुलाचा वियोग आणि त्याची आठवण त्यांना अस्वस्थ करीत होती. त्यांना सतावणाऱ्या मुलाच्या आठवणीतून 'प्रभाकरास' कवितेचा जन्म झाला. सावरकरांचा वात्सल्यभाव ''अमूर्त तू कल्पना एक मधुमधुर अशी हृदया'' कवितेतून व्यक्त होतो. सावरकरांनी पॅरिसमध्ये 'शिखांचा इतिहास' हे पुस्तक लिहिले आणि 'प्रभाकर' याला अर्पण केले. 'शिखांचा इतिहास' हे पुस्तक राष्ट्रीय संपत्ती म्हणून मागून घेतली पाहिजे, प्रसिद्ध केली पाहिजे असे लेखक परखडपणे म्हणतो. 'प्रियकर हिंदुस्थान', 'सागरा प्राण तळमळला' ही अजरामर कविता यांचा समावेश पुस्तकात आहे.

स्वातंत्र्यवीर सावरकरांनी समुद्रात मारलेली उडी म्हणजे अलौकिक धाडसच होते. इंग्लंडमधील पत्रकार गाय आल्ट्रेड यांनी टीकेचा इतका भडीमार केला की प्रक्षोभ वाढून तीन दिवसात फ्रान्सचे पंतप्रधान ॲरिस्टीड क्रिगॉ यांना आपल्या पंतप्रधानपदाचा राजीनामा द्यावा लागला. सावरकरांच्या मार्सेलिस पराक्रमाने हिंदुस्थानबाहेरचा हा सर्वांत मोठा बळी घेतला.

### सुबोध सुस्पष्ट शैली

लेखकाचे हे सर्व विवेचन अत्यंत सुबोध आणि सुस्पष्ट शैलीत प्रकट झाले आहे. त्याच्या मांडणीमध्ये अहंकार आणि अभिनिवेश नाही. परूळकरांचा दृष्टिकोन प्रगल्भ आणि समंजस आहे. लिखित गोष्टी हा पुढे इतिहास ठरतो तो चुकीचा असू नये याची दक्षता लेखकाने घेतली आहे. या पुस्तकाचे आणखी एक वैशिष्ट्य म्हणजे या पुस्तकाला जोडलेली परिशिष्टे. ती महत्त्वाची तर आहेतच पण परिशिष्ट जोडल्यामुळे पुस्तक दर्जेदार झाले आहे. पुस्तकाचा दर्जा वाढला आहे.

पुस्तकात थोडेसे मुद्रणदोष आहेत. सोगितले (पृ.६९) 'सांगितले' पाहिजे होते तसेच पृ.१२२ वर सावरकरांचे श्वशुर चिपळूणकरांना जव्हारला कारभारी म्हणून येण्यास काही आक्षेप नाही. राजेसाहेबांनी त्यांना त्यांच्या पदावर पुनश्च निवृत्त करावे.' 'निवृत्त'च्या जागी 'नियुक्त' पाहिजे होते. त्याचप्रमाणे परिशिष्टात (पृ.१८९) श्री. मिलिंद गाडगीळांनी 'प्रज्वलंत' नियतकालिकात लिहिलेल्या लेखाचा संदर्भ १५ ते २५ फेब्रुवारीचा प्रज्वलंत अंक म्हटले आहे, सन कोणता तो देण्यास पाहिजे. पुस्तकाची दुसरी आवृत्ती निघेल तेव्हा या चुका टाळता येतील.

### सुरेख मुखपृष्ठ

मातृभूमीच्या भेटीची ओढ लागलेले, प्रतिक्षा, आतुरता, मातृभूमीच्या भेटीसाठी, स्वजनांसाठी व्याकुळ झालेले मन त्यातील आर्तभाव डोळ्यांतून व्यक्त होतो तसेच देश स्वतंत्र झालेला, द्रष्टेपणा आणि आत्मविश्वासही या डोळ्यांतून दिसतो. उसळणारा दर्या, फेसाळणाऱ्या लाटा त्यावर आरूढ झालेल्या मोरिया बोटीचे अत्यंत जिवंत, परिणाकारक चित्र रेखाटले आहे. मुखपृष्ठकार सतीश भावसार यांचे अभिनंदन.

'सावरकरांचा मार्सेलिस पराक्रम' हे पुस्तक प्रत्येक तरुणाने वाचावे. त्यामुळे त्यांना प्रेरणा मिळेल आणि देशाचे संरक्षण करण्यासाठी शत्रूला कसे नष्ट करावे ते ही स्वातंत्र्यवीर सावरकरांच्या जीवनचरित्राच्या अभ्यासाने समजेल.

**सावरकरांचा मार्सेलिस पराक्रम**
लेखक : दुर्गेश परूळकर
प्रकाशक : गार्गीज प्रकाशन, वसई
पृष्ठसंख्या : १९२ पाने
मूल्य : २०० रुपये

**समीक्षिका - डॉ.सौ.सुमेधा प्र. मराठे,**
**(पृ.१२०)** ८/१३, सहकार नगर,
वडाळा, मुंबई ४०० ०३१
दूरध्वनी : ०२२-२४१५०८८९

### मानसन्मान



मराठे परिवारातील **निखिल शंतनू मराठे** (वय १९ वर्षे) याला अमेरिकेतील विख्यात गुगल कंपनीकडून 'केडीई' प्रोग्रॅमसाठी एक प्रोजेक्ट मिळाले आहे. ते तीन महिन्यात पुरे करायचे असून त्याबद्दल त्याला ५,००० डॉलर्स मानधन मिळणार आहे.

हा प्रोग्रॅम करणाऱ्यांची जागतिक परिषद फिनलंडमधील हेल्सिंकी राजधानीच्यानजीक टॅम्पेरे येथे ३ ते १० जुलैपर्यंत भरत असून तीत भाग घेण्याचा बहुमान निखिलला मिळाला आहे. भारतातून परिषदेसाठी पाचजण जाणार असून निखिल त्यापैकी एक. सुमारे ३०० प्रतिनिधी परिषदेत भाग घेणार आहेत.

निखिल सध्या गांधीनगर (अहमदाबाद) येथील 'धीरूभाई अंबानी इन्स्टिट्यूट ऑफ इन्फॉर्मेशन अँड कम्युनिकेशन टेक्नॉलॉजी' मध्ये तिसऱ्या वर्षाला शिकत आहे. तो माध्यमिक शाळेत असताना 'लिनक्स' या कॉम्प्युटर शिक्षणाला वाहिलेल्या इंग्रजी मासिकात त्याचे लेख प्रसिद्ध झाले हाते. त्याला फुटबॉलची विशेष आवड असून तो त्याच्या वर्गाच्या फुटबॉल संघाचा कर्णधार होता.

मराठे परिवाराचे ज्येष्ठ सदस्य अनंत सदाशिव मराठे (पृ.३६५) यांचा निखिल हा नातू. त्याने आजपर्यंत मिळवलेले यश कौतुकास्पद असून त्याबद्दल मराठे परिवारातर्फे त्याचे अभिनंदन व त्यास पुढील यशस्वी वाटचालीसाठी शुभेच्छा!

**कु. उमेश मनोहर मराठे,** (खुडीपाट, ता. देवगड) हा एचएसी वाणिज्य शाखेतून ८१.३३% गुण मिळवून उत्तीर्ण झाला. कु. उमेशचे मराठे प्रतिष्ठानद्वारा अभिनंदन व पुढील शैक्षणिक यशासाठी सदिच्छा

# "99 CLUB" A Mirage

Long ago, there lived a King. The King always found himself wondering why he just never seemed content with his life. One day, the King had woken up earlier than usual to stroll around his palace. He saw that one of the servants was singing and had a very contented look on his face.

The King asked why he was so happy?

To this the man replied : "We don't need too much - a roof over our heads and warm food to fill our tummy. My wife and children are my inspiration, they are content with whatever little I bring home. I am happy because my family is happy."

The King related the story of the servant to his Personal Assistant, hoping that somehow, he will be able to come up with some reasoning that here was a King who could have anything he wished for at a snap of his fingers and yet was not contented, whereas his servant having so little was extremely contented.

The Personal Assistant listened attentively and came to a conclusion. He said, "Your Majesty, I believe that the servant has not been made part of The 99 Club." To truly know what The 99 Club is, you will have to do the following... Place 99 Gold coins in a bag and leave it at this servant's doorstep, you will then understand what the 99 Club is."

That very same eveing the King arranged for 99 Gold coins to be placed in a bag at the servant's doorstep. The servant was just stepping out of his house when he saw a bag at his doorstep. Wondering about its contents, he took it into his house and opened the bag. When he opened the bag, he let out a great big shout of joy... Gold Coins... so many of them... He could hardly believe it. He called his wife to show her the coins. He then took the bag to a table and emptied it out and began to count the coins. Doing so, he realised that there were 99 coins and he thought it was an odd number so he counted again and again and again only to come to the same conclusions... 99 Gold Coins.

He began to wonder, what could have happened to that last 1 coin? For no one would leave 99 coins. He began to search his entire house, looked around his backyard for hours, not wanting to lose out on that one coin. Finally, exhausted, he decided that he was going to have to work harder than ever to make up for that 1 Gold coin to make his entire collection of even 100 Gold Coins.

He got up the next morning, in an extremely horrible mood, shouting at the children and his wife for his delay, not realising that he had spent most of the night conjuring ways of working hard so that he had enough money to buy himself that gold coin. He went to work as usual - only not in his usual best mood, singing happily - as he grumpily did his daily errands.

Seeing the man's attitude change so drastically, the King was puzzled. He promptly summoned his assistant to his chambers. The King related his thoughts about the servant and once again, his assistant listened. The King could not believe that the servant who until yestardy had been singing away and was happy and content with his life had taken a sudden change of attitude, even though he should have been happier after receiving the gold coins.

To this the assistant replied "Ah! but your Majesty, the servant has now officially joined The 99 Club." He explained, "The 99 Club is just a name given to those people who have everything but yet are never contented. Therefore they are always working hard and striving for that extra 1 to round it out to 100! We have so much to be thankful for and we can live with very little in our lives. But the minute we are given something bigger and better, we want even more! We are not the same happy contented person we used to be. we want more and more and by wanting more and more we don't realise the price we pay for it. We lose our sleep, our happiness. We hurt the people around us just as a price to pay for our growing needs and desires. That is what joining The 99 Club is all about."

Hearing this the King decided that from that day onwards, he was going to start appreciating all the little things in life. Striving for more is always good, but let's not strive so hard and for so much that we lose all those near and dear to our hearts. We should not compromise our happiness for moments of luxuries!

**प्रेषक - श्री. रमाकांत विद्वांस (पृ. ६२३)**

## अभीष्ट चिंतन

आपले कुलबांधव **श्री. चिंतामणी त्र्यंबक मराठे (पृ.२४८)**, कळवा
यांनी अमृतमहोत्सवी पंच्याहत्तराव्या वर्षात पदार्पण केले आहे.
त्यानिमित्त १००० रु. देणगी त्यांनी प्रतिष्ठानला दिली आहे.
मराठे प्रतिष्ठानद्वारा श्री. चिंतामणी मराठे यांचे अभीष्टचिंतन.
परमेश्वर त्यांना आरोग्यसंपन्न, सुखी दीर्घायुष्य देवो,
जीवेत शरद:शतम्। ही प्रार्थना!

# परोपकारी अक्का

**श्री. गोविंद ना. मराठे**

श्री. गोविंद ना. मराठे, गोवा यांची मोठी बहीण कै. सौ. आक्का म्हणजे शांता प्रभाकर दातार ह्यांचे दिनांक ३ जुलै २०१० ला मिरज येथे निधन झाले. मराठे प्रतिष्ठानद्वारा सौ. आक्का तथा शांता दातार यांना भावपूर्ण श्रद्धांजली. श्री. गोविंद ना. मराठे यांच्या दु:खात मराठे परिवार सहभागी आहे. भावाने मोठ्या बहिणीला वाहिलेली श्रद्धांजली 'परोपकारी अक्का' या लेखात देत आहोत

-संपादिका

आम्ही आठ भावंडे. चार भाऊ चार बहिणी. त्यापैकी एक सर्वांत मोठी सुमारे पन्नास वर्षांपूर्वी अल्पशा आजाराने गेली. आताच १९ दिवसांपूर्वी दुसरीचे आकस्मिक निधन झाले. तिचे नाव शांता. आम्ही तिला आक्का म्हणून हाक मारीत असू.

तिचा जन्म १९३५ सालातला. ७४ वर्षे जगली. १९५७ साली तिचे लग्न सांगलीच्या कै.प्रभाकर वा. दातार यांच्याशी झाले. त्यांना एकच भाऊ व भावजय. भाऊही वर्षभरापूर्वी वारला. तिला एकच कन्यारत्न झाले. ती म्हणजे सुनिता. तिचे लग्न कोल्हापूरचे श्री. गजानन चिं. कानिटकर यांच्याशी लावून देण्यात आले. त्यांना दोन अपत्ये - मुलगा व मुलगी. शेवटच्या क्षणी नातवाच्या अंकावर आक्काने देह ठेवला. पुत्र नसला तरी नातवाने अखेरचे पाणी पाजले.

तिच्यापेक्षा आम्ही चार-पाच भावंडे लहान. आईप्रमाणे तिने त्या काळात आमचे सारे काही केले. ती गेल्यावर आजही त्या आठवणींनी कृतज्ञतेचे अश्रू डोळ्यांतून ओघळू लागतात.

आमचे भावोजी पी.डब्ल्यू.डीमध्ये नोकरी करत असत. त्यामुळे सांगली, मिरज या भागात त्यांची बदली होई. बदलीच्या ठिकाणी ते भाड्याच्या घरात राहात असत. त्यावेळी कधी सुट्टीत तर कधी रजा काढून मी त्यांच्याकडे दोन-चार दिवस राहत असे. त्यामुळे भाचीला मामाबद्दल ओढ वाटते.

आक्काचे शिक्षण जेमतेम मराठी चौथीपर्यंत झालेले. सरावाने ती इंग्रजी शंभरपर्यंत अंक लिहीत असे. त्याचा उपयोग करून कोणताही शिवणकामाचा कोर्स न करता सर्वप्रकारचे पुरुष व स्त्रियांचे कपडे लीलया शिवत असे. गेली २०-२५ वर्षे स्वत:च्या जागेवर छोटेसे व टुमदार घर तिने बांधून घेतले होते. त्याचे नावही ठेवले आहे 'सदिच्छा'. याच घरात सोळा वर्षांपूर्वी आमचे भावोजी दीर्घ आजाराने वारले. आणि त्यांच्या दहा वर्षांच्या आजारात आईपेक्षाही सेवा केली. त्या उपचाराचे वर्णन करण्यास शब्द अपुरे पडतात. पण तिने धीर सोडला नाही व कोणाचीही आर्थिक मदत सोडल्यास तिच्यासोबत ८-१५ दिवस राहण्यास कोणीही जाऊ शकले नाही. माझाही अपवाद नाही. मनाला यातना होतात. शेवटची सोळा वर्षे तिने एकाकी जीवन व्यतीत केले. त्याला तोड नाही. हिंदू, ख्रिस्ती, मुस्लिम हेच तिचे भाऊबंद होते. मुलीनेही आपल्यापरीने वेळोवेळी आधार दिला. पण आकाशाला ठिगळे किती लावायची? हाच एक अपवाद होता.

आक्काला समाजकार्याची आवड होती. कोणाचेही आमंत्रण येवो ती लग्नसोहळ्याला जात असे. कोरडे पदार्थ व सरबत पीत असे. कोणाचे बँकेत खाते उघड, कोणाचे रेशनकार्ड बनव, कुणाचे कपडे शिवून दे तर कुणा गरीबाला मदत कर. कुणी आजारी असला तर जावे. तिचा लोक-संग्रह बराच होता. प्रेमळ स्वभाव, शांत वृत्ती, आपलेपणा, कळवळ हे गुण तिच्याठायी एकवटले होते. दातारवहिनी या नावाने तिची ओळख होती.

आज तिचे घर मोकळे झाले आहे. घरातील नावाची सदिच्छा राहिली आहे. निरागस चित्ररूपी चेहरा दिसतो आहे. बगिच्यातील झाडे नि:शब्द झाली आहेत. नळ कोरडे पडले आहेत. खांबावर ठेवलेल्या चिमण्या पाखरांच्या थाळीतील पाणी व दाणे उडून गेले आहेत. शेजारी वहिनीच्या आठवणी काढताहेत. आता कसा जाऊ त्या सदनात. सदनात आहेत त्या आठवणींचे सूर.

आमच्या दोन बहिणींची बाळंतपणे तिने काढली. आई होऊन पण निरपेक्षपणे,आनंदाने जणू काय भाच्यांची आजीच. त्याला तोड नाही. जर पुनर्जन्म असलाच तर आमची आक्का आम्हाला पुन्हा मिळावी. 'अशी पाखरे येती आणिक जाती, दोन दिसांची नाती' परमेश्वर आक्काला चिरशांती देवो.

**- श्री. गोविंद ना. मराठे**

## सहवेदना

श्रीमती वसुंधरा राजाराम मराठे ( पृ. ६२, वय ७२वर्षे) यांचे दीर्घ आजारपणामुळे दिनांक ९ जून २०१० रोजी निधन झाले. ईश्वर मृतात्म्यास सद्‌गती देवो.

**- अविनाश राजाराम मराठे,**
**पुणे ४११०३०**

## ।। गृहस्थ गीता ।।

आतिथ्य हेच घराचे वैभव.
प्रेम हीच घराची प्रतिष्ठा.
व्यवस्था हीच घराची शोभा.
समाधान हेच घराचे सुख.
सदाचार हाच घराचा सुगंध.
अशा घरीच परमेश्वराचा
नित्य वास असतो.
कर्ज (ऋण) होईल असा
खर्च करू नका.
पाप होईल अशी कमाई करू नका.
क्लेश होईल असे बोलू नका.
चिंता होईल असे जीवन जगू नका.
रोग होईल असे खाऊ नका.

**प्रेषक - श्री. रमाकांत विद्वांस (पृ. ६२३)**

# झडती

- डॉ. सीमा मराठे (पृ.४११)

श्रावण महिन्यातील पावसाची रिमझिम आणि मधूनच चंदेरी सूर्यप्रकाश यांच्यातील लपाछपीचा खेळ अव्याहतपणे चालला होता. हिरवीगार वनश्री अगदी तारुण्याने मुसमुसली होती. धरती तर पूर्णपणे अलंकारित झाली होती. विविध रंगांच्या फुलांनी!

मधुरा आपल्या घराच्या व्हरांड्यातील केनच्या खुर्चीत बसून हा सुंदर नजारा डोळे भरून पाहत होती. किती वेळ कोण जाणे!...अर्धातास... तास? आज एकटीच होती ना घरात! मुलं शाळेत, सासूबाई मुलीकडे अन् संतोष कामावर. 'नवरत्न' नावाच्या सराफी दुकानात कॅशियरचं काम होतं त्याचं. तसं जोखमीचंच! पण त्याच्या प्रामाणिकपणामुळे मालकाच्या मर्जीतला.

आणि...आणि... अचानक हॉलमधली फोनची बेल वाजली अन् मधुरा दचकली. समाधीचा भंग झाला. नाजूक, शांत मनात एकाएकी तरंग उठले. नाराजीचे,... किंचित रागाचे.. आणि काहीशा भीतिचेही. उठून पळत जाऊन फोन उचलला. पलीकडून संतोष अगतिकपणे बोलू लागला, ''मधुरा, नीट ऐक काल रात्री येताना मी ब्रीफकेस आणली होती. काळ्या रंगाची, आठवते?''

''हो.''

''ती मी कपाटात ठेवलीय. तू घाईने स्वयंपकाघरात गेलीस म्हणून त्याविषयी आपलं बोलणंच झालं नाही.''

''आणि मी ही विसरून गेले.''

''पण आता ताबडतोब ती आपल्या घराच्या तळघरातील खोलीत नेऊन ठेव. आणि लपवून झाकून ठेव. ... त्या लाकडी पेटीमध्ये ठेवलीस तर उत्तमच. आणि त्यावर पुस्तकं वा इतर सामान ठेव. कोणाला ती दिसता कामा नये.'' म्हणून संतोषने फोन ठेवून दिला.

मधुरा हबकलीच. संपूर्ण शरीर गोठल्यागत झालं. परंतु मन वेगाने पळू लागलं. असं काय आहे त्या ब्रीफकेसमध्ये? त्याने ती घरी का आणली? संतोष एवढा घाबरला का होता? मला का सावध केलं त्याने? अनेक प्रश्नांची रीघ लागली. पण... सावध व्हायला हवं हे तिनं जाणलं. अचानक अंगात बळ आलं अन् ती ब्रीफकेस घेऊन तळघरात गेली.

हे राहतं घर तसं जुनंच. संतोषच्या आजोबांनी बांधलेलं. दोन मजली अन् सुंदर. आजपर्यंत चांगलं मेन्टेन केलेलं. घराला पूर्वीच्या पद्धतीप्रमाणे तळघर होते. तिथे म्हणे धान्य, गुळाच्या ढेपा वगैरे साठवणीचे पदार्थ ठेवायचे. शिवाय भलीमोठी तांब्या पितळ्याची भांडी, हंडे, घंगाळी, पाट, ताटं वगैरेही होती. भल्यामोठ्या सागवानी लाकडाच्या नक्षीकाम केलेल्या पेट्याही होत्या. त्यावर पितळ्याची फुले असून जाड पितळी कड्या होत्या. मधुराने एका पेटीची कडी उडघली आणि दार कष्टानेच उचलून उघडलं. एका हाताने दार सांभाळत दुसऱ्या हाताने ती ब्रीफकेस आत ठेवली. त्यावर त्यातच असलेल्या पुस्तकांचा ढीग रचला. पेटीचं ते जड दार लावलं. त्यावर एक पोतं अंथरलं. नंतर झटकन मागे वळून खोलीचं दार लोटून घेतलं. कडी लावली अन् झपाझप जिन्याच्या पायऱ्या चढली.

भराभर हालचाली केल्यामुळे तिला दरदरून घाम आला. धाप लागली. हृदयाचे ठोके जलद झाले. हॉलमध्ये येऊन सोफ्यावर स्वत:ला झोकून दिलं. प्रचंड मानसिक दडपण, आणि शरीराला आलेली शिथिलता अशा अवस्थेत ती डोळे मिटून काही मिनिटे पडून राहिली. विचारचक्र सुरू होते.

काय घडणार आहे? ... समोर कोणतं संकट उभं राहणार आहे? त्यावर कोणता उतारा प्रभावी ठरणार आहे? ... संतोषने अगोदर कोणतीही कल्पना का दिली नव्हती? सकाळच्या कामाच्या गडबडीत तर त्या ब्रीफकेसचं अस्तित्वही ती विसरली होती. कदाचित संतोषही विसरला असावा. काही असो. असं पॅनिक होऊन नाही चालणार. सूज्ञपणे विचार करायला हवा. डोकं शांत ठेवायला हवं. संतोषवर काहीतरी संकट आलं असणार.. त्या ब्रीफकेसमध्ये काय असेल? दागिने? संतोष सराफी दुकानातच काम करतो. तिथे चोरी तर नाही झाली? हल्ली रोज पेपरात सराफी दुकानांवरील चोऱ्यांबद्दल बातम्या येत असतात. पण...पण.. संतोषचा काय संबंध? संबंध नाही तर मग ती ब्रीफकेस का आणली त्याने घरी? कदाचित त्यामध्ये पैसे असतील. कॅशियर आहे ना तो? पण काल तर तो म्हणाला की त्याचा मित्र प्रदीपने ती त्याच्याकडे ठेवायला दिली म्हणून. प्रदीपही त्याच दुकानातील काऊंटरवर काम करतो. दोघं शाळेपासूनचे मित्र.

प्रदीप... मधुरा आठवू लागली. त्याची आर्थिक स्थिती हालाखीचीच. तो दहावी पास झाला अन् पित्याचं छायाछत्र कर्मानं ओढून नेलं. त्यात भरीसभर म्हणून चार लहान भावंडे. दोन भाऊ अन् दोन बहिणी. पुढे त्यांच्या जबाबदारीतून निसटला अन् आई निवर्तली. तिचं पेन्शन थांबलं. सरकारी शाळेत नोकरीला होती पूर्वी. तिच्या पेन्शनमध्ये काही बिलं भागायची, आता प्रदीपचा पगार पुरेनासा झाला. बायको कमी शिकलेली. सर्वसाधारण गृहिणी.

अन् म्हणूनच प्रदीपला त्याच्याच दुकानातून दागिने चोरण्याचा मोह तर झाला नसेल? त्याच्या साथीला दुसरं कोणीतरी असणार. ... म्हणजे संगनमत करूनच... संतोष त्यात सामील असेल? नाही...नाही... तो अशा भानगडीत पडणार नाही. तशी गरजही नव्हती. परंतु पैशाचा मोह काही वेळा माणसाला आडवाटेकडे नेतोसुद्धा.

मधुरा किती विचार करणार? शक्याशक्यतेला काहीच मर्यादा नसते. उगीच मेंदूला कष्ट देण्यात अर्थ नाही. अशी स्वत:ची समजूत घालून उठली. चेहरा पाण्याने धुतला. एव्हाना दुपारचे बारा वाजून गेले होते. स्वयंपाक सकाळीच तयार झाला होता. एक वाजता मुलं येतील शाळेतून. सकाळची शाळा ना!

संतोषला फोन करणंही योग्य वाटेना. काय चाललं असेल दुकानात कोण जाणे! पोलीस

आले असणार बहुतेक. चौकशीसुद्धा सुरू असेल... कदाचित!

एक वाजता सुमीत अन् श्रृती शाळेतून आले. त्यांचे कपडे बदलून जेवायला वाढले. जेवण झाल्यावर दोघांनाही झोपायची सवय. सकाळी साडेपाच वाजताच उठावं लागायचं. मुलांना तिने आज अधिकच आत्मियतेने झोपवलं. मुलं गाढ झोपी गेली.

अडीच वाजता फोन वाजला. संतोषचाच असणार! तिने फोनवर झडपच घातली. संतोषचाच होता. अस्वस्थ अन् अगतिक परंतु हळू आवाजात तो सांगू लागला. मोबाईल जवळ होता म्हणून बरं!

"मधुरा, मी बाथरूममधून बोलत आहे. दुकानात पोलिसांना बोलावलं आहे मालकांनी. मधुरा! फार मोठ संकट आलंय ग आपल्यावर. त्या प्रदीपने काही साथीदारांच्या मदतीने दुकानातील दागिने चोरले अन् जबानीच्यावेळी ती दागिने ठेवलेली ब्रीफकेस माझ्याजवळ दिली असं सांगितलं.

"मग? तू काय सांगितलंस? तू तर नव्हतेस दागिने चोरलेस माझी खात्री आहे."

"मधुरा मी चक्क पोलिसांना सांगितलं की प्रदीपने माझ्याजवळ ती ब्रीफकेस दिली नाही म्हणून. मालकांनाही माझ्याबद्दल संशय नाही. पण मधुरा, पोलिसांची खात्री नाही पटली. झडतीचं वारंट घेऊन येणार आहेत आपल्या घरी. अपराध न करताही अपराधी वाटंतय ग मला" फोन कट झाला.

'आपल्या घराची झडती? अरे संतोष काय करायचं आता?'

मधुराच्या पायाखालची जमीन सरकली. मट्‌कन जमिनीवर बसली. काय हा प्रसंग? जन्मापासून मधुरा चांगल्या संस्कारात वाढलेली. आपण चांगलं असलं की कोणी आपलं वाकडं करू शकत नाही हा विश्वास अंगी बाळगलेली. पण आज तो विचार फोल ठरला होता. जीवनाच्या नाण्याची दुसरी बाजू माहीतच नव्हती तिला.

अरे बापरे! आता बदनामी होणार! आजूबाजूचे लोक वेगळ्या नजरेने आपल्याकडे बघणार. पोलीस घरी झडती घ्यायला येणार म्हणजे काहीतरीच! मधुराला भीतीने घाम फुटला. काही चूक न करता चटके अन् अपराध न करता शिक्षा असं झालं होतं.

पण... पण... समोर आलेल्या वादळाला तोंड देणं अपरिहार्य होतं. हे वादळ शमवायला हवं होतं काही झालं तरी!

नकळत आलेले डोळ्यांतील अश्रू पुसत असतानाच दारावरील बेल वाजली. धोक्याची सूचना देत, मधुराने दार उघडलं तर दारात चार पोलीस उभे! दोघे साध्या वेशात तर दोघे पोलीस गणवेशात. त्यापैकी एकाने झडतीचे वॉरंट समोर धरले. मधुराने ते वाचले अन् बाजूला सरकली. तेवढ्यात मुलंही उठून मधुराजवळ येऊन उभी राहिली. काय प्रकार आहे हे त्यांना कळेना. पण काहीतरी अनैसर्गिक आहे याची जाणीव पोलिसांना बघून झाली. भीतीयुक्त वातावरण पसरले. कोणीही चकार शब्द बोलत नव्हतं.

चार पोलिसांपैकी तिघं जणांनी झडती सुरू केली. शोधाशोध वेगाने चालू झाली. टेबलांचे ड्रॉवर्स उघडून आतील सर्व सामान बाहेर काढले. शोकेस, कपाटे, उघडून कपडे, वस्तू खाली फेकू लागले. माळ्यावरची पुस्तकांनी भरलेली खोकी झपाट्याने काढून उलटी केली. सर्व प्रवासाच्या बॅगा उघडून पाहिल्या. स्वयंपाकघरातील सर्व भांड्यांची रॅक्स, कपाटे, ट्रॉलीज अक्षरश: रिकामी करून जमिनीवर सर्व वस्तूंचा खच पडला. काचेची भांडी, काही ग्लास फुटलेदेखील. मधुराला कपाटाचे लॉकर उघडायला सांगितले. तिने ते उघडून लग्नात माहेरून घातलेले दागिने त्यांना दाखवले. एक तन्मणी, सोन्याचं नेकलेस, तोडे, दोन तऱ्हेची कर्णफुले जुनी आहेत हे पोलिसांनी ओळखले. सोन्याच्या बांगड्या तिच्या हातातच लग्नापासून होत्या. तिच्या लहानश्या विश्वातले ते दागिने म्हणजेच तिला खूप अभिमानास्पद वाटत असत. पोलिसांनी ते न्याहाळून पुन्हा तिच्या हातात दिले.

वरचा मजलाही संपूर्णपणे पोलिसांनी न्याहाळला. संपूर्ण घर सैरभैर झाले. तळघर त्यांच्या नजरेस पडले नाही त्यामुळे मधुराने मोठा नि:श्वास टाकला. घर अस्ताव्यस्त करून अखेर पोलीस काही न मिळाल्यामुळे हात हलवीत निघून गेले.

मधुरा अन् मुलं काही काळ तसेच मानसिक दबावाखाली स्तब्ध राहिले. घर पुन्हा जसंच्या तसं करायचं म्हणजे काही दिवस लागणार होते.

अंदाजे एक तासानंतर संतोष घरी आला. शेजारच्या घरांमधून झडतीची ही बातमी हा हा म्हणता पसरली. कुजबूज सुरू झाली. अखेर संध्याकाळी बाळूकाका आले.

"काय रे संतोष, काय झालं? पोलीस आले होते म्हणे?" इकडेतिकडे पाहत 'झडती घेतलेली दिसतेय, अरे कसलं बालंट आलं तुझ्यावर?'

मधुरा, मुलं, संतोष अन् बाळूकाका सोफ्यावरील सामान खाली काढून त्यावर बसले. संतोषने थोडक्यात सर्व हकीगत सांगितली. बाळूकाका गहिवरले. मनात म्हणाले, हे परमेश्वरा काय रे हा प्रसंग आणलास ह्या साध्या सरळ माणसांवर?... पण आता ह्यांना धीर द्यायला हवा.

"झालं ते झालं. संकट टळलंय. काही काळजी करू नका. तुझ्या तो दुकानाचा मालक नेर्लेकर माझा मित्रच आहे. त्याला सर्व हकिगत सांगतो अन् ती ब्रीफकेसही देऊन येतो. सर्व काही ठीक होईल. मधुरा, सुमीत,शृती आणि संतोष तूसुद्धा... चला आमच्या घरी. तुमची काकू वाट पाहत असेल. आपण सर्व मिळून उद्या घर आवरू या. मधुरा! तर ब्रीफकेस आणून दे मला. मात्र एका मोठ्या पिशवीत ठेवून दे माझ्याजवळ. रात्री जाईन नेर्लेकराकडे."

दुसरा दिवस उजाडला. बाळूकाकांनी आपलं काम चोख बजावलं होतं. स्वत: नेर्लेकरच संतोषला भेटायला आले आणि धन्यवाद दिले.

"संतोष, बाळूकाकांसारखी आणि तुझ्यासारखी प्रामाणिक माणसं फार भाग्याने मिळतात. तू उद्यापासून कामावर नेहमीप्रमाणे ये. प्रदीप आणि त्याच्या साथीदारांना मी नोकरीवरून काढून टाकलं आहे. ते सर्व पोलिसकोठडीत आहेत. मधुरा अन् मुलांवर फारच भयानक प्रसंग आला. मधुरा! तूही चांगला धीर दाखवलास त्याबद्दल तुझेही धन्यवाद मानायला हवेत." नेर्लेकर निघून गेले.

पुढे चार-पाच दिवसात सर्व घर पुन्हा छान लावलं सर्वांनी मिळून. संकट पार दूर निघून गेलं होतं. परंतु जाता जाता मनावर एक दु:खाची लकीर कोरून गेलं. पोलीस झडतीचा प्रसंग कायमस्वरूपी लक्षात राहणार होता.

**- डॉ. सीमा मराठे (पृ. ४११)**

भुसारी कॉलनी, फ्लॅट नं. १२९ घर नं. ७८,

वेदभवनजवळ, पौडरोड, कोथरूड ४११ ०३८

फोन नं. ०२०-२५२८०३०९ / २४४५६०६३

# आवाहन : मराठे कुळातील कर्तृत्ववान व्यावसियांकासाठी

**- मराठे प्रतिष्ठान, पुणे शाखा**

आपण सर्वजण कपी गोत्री चित्पावन. काळानुरूप बदलावे हे चित्पावनांचे वैशिष्ट्य आहे. प्रारंभापासून मराठे प्रतिष्ठानचे आधारस्तंभ असलेले. कै. सुरेशभाऊ मराठे हे नेहमी तरुणांनी नोकरीच्या मृगजाळामागे न धावता उद्योग व्यवसायात पदार्पण करून व्यवसायनिष्ठ बनावे असे तळमळीने सांगत असत. त्यानुसारच आता आपल्यातील बरेच कुलबांधव नोकरीकडून व्यवसायाकडे वळत असल्याचे दिसत आहे. दिवसेंदिवस नव्या पिढीत व्यावसायिकांची संख्या वाढतच आहे. व्यवसायासाठी लागणारे बुद्धीचातुर्य, भरपूर कष्ट करण्याची तयारी, निर्णयक्षमता व गोड वाणी हे गुण या पिढीने आत्मसात केले आहेत.

आपल्यातील अशा व्यावसायिकांची माहिती सर्वांना व्हावी व त्याचा फायदा सर्व कुलबांधवांना मिळावा या उद्देशाने मराठे प्रतिष्ठान पुणे शाखेने व्यावसायिकांची माहिती एकत्र करण्याचे ठरवले आहे. मराठे प्रतिष्ठान, पुणे शाखा नेहमीच निरनिराळे नाविन्यपूर्ण उपक्रम राबवत असते हे आपणास माहीत आहेच. त्यानुसार मराठे व्यावसायिकांची माहिती पुस्तिका प्रसिद्ध करून ही पुस्तिका सर्व कुलबांधवांपर्यंत पोहोचावी अशी योजना आहे.

या व्यावसायिक माहिती पुस्तिकेत उत्पादक, सेवा देणारे, छोटे-मोठे कारखानदार, दुकानदार, बिल्डर, वैद्यकीय, शैक्षणिक, वकिली, टुरिस्ट, आर्थिक सल्लागार, मार्गदर्शक व इतरही अनेक व्यवसायांची माहिती विभागवार देण्यात येईल. वाचक व व्यावसायिक दोघांच्याही दृष्टीने हे सोयीचे होईल असे वाटते.

सर्व व्यावसायिकांनी आपली माहिती पुढील मुद्द्यांच्याआधारे पाठवावी ही विनंती. व्यावसायिकाची व्यक्तिगत माहिती, पासपोर्ट साईज फोटो, व्यवसायाची पूर्ण माहिती, व्यवसायाचे पूर्ण नाव, पत्ता, दूरध्वनी क्रमांक, भ्रमणध्वनी क्रमांक (मोबाईल), वेबसाईट, ई-मेल आयडी इत्यादी गोष्टी ठळकपणे देण्यात येतील. या उपक्रमात व्यावसायिक मराठे कुलबांधव, कुलभगिनी व माहेरवाशिणी सहभागी होऊ शकतील. योग्य ते देणगी मूल्य घेऊन ही व्यावसायिक माहिती पुस्तिका छापण्याचा विचार आहे.

आपण व्यावसायिक बंधूभगिनी सहकार्य कराल याची खात्री असल्यानेच हा नवीन उपक्रम पुणे शाखा हाती घेत आहे. तरी लवकरात लवकर आपल्या व्यवसायाची सविस्तर माहिती आपण आमच्याकडे पाठवावी म्हणजे या व्यावसायिक माहिती पुस्तिकेचे प्रकाशन २६ जानेवारी, २०११ला मराठे प्रतिष्ठानच्या ३१व्या वर्धापन दिनाच्या कार्यक्रमात करणे सुलभ होईल. (कमीत कमी १०० व्यावसायिकांची माहिती आली तरच ही पुस्तिका काढणे शक्य होईल.)

या संदर्भात अधिक माहितीसाठी पुढील व्यक्तींशी संपर्क साधावा ही विनंती.

**१. कर्नल प्रमोदन प्रभाकर मराठे**
ए-१, उषा अपार्टमेंट,
तुळशीबागवाले कॉलनी,
सहकारनगर नं.२, पर्वती,
पुणे - ४११ ००९
फोन नं. : ०२०-२४२२४७८९
मोबाईल नं. : ९८५०१२५७३६

**२. श्री. श्रीनिवास गोपाळ मराठे**
त्रिवेणी नं.१. दख्खन पाटबंधारे सोसायटी
पांडुरंग कॉलनी, एसएनडीटी कॉलेजसमोर.
एरंडवणे, पुणे - ४११ ०३८
फोन नं. : ०२०-२५४६४७०६
मोबाईल नं. : ९८२२७७७३६१

**३. श्री. विजय विष्णू मराठे**
३६२, बुधवार पेठ,
मनोरमा अपार्टमेंट, खंडोबा मंदीर
विजयानंद टॉकीजजवळ, पुणे - ४११ ००२
फोन नं. : ०२०-२४४९४९४९
मोबाईल नं. : ९४२३०११९४९

**४. श्री. माधव वासुदेव मराठे**
श्वेता सोसायटी, ए-१, फ्लॅट नं. ५.
जयदेव नगर, सिंहगड रोड,
पुणे - ४११ ०५१
फोन नं. : ०२०-२४२५०१६६
मोबाईल नं. : ९०२२४१७०२१

**५. श्री. गजानन चिंतामणी मराठे**
३४ अ, सेनादत्त पेठ,
'सार्थक' बंगला, पुणे - ४११ ०३०
फोन नं. : ०२०-२४५३१६५१

**६. सौ. नीलांबरी रमेश मराठे**
व्यंकटेश मार्गदर्शन केंद्र,
६४२ नारायण पेठ,
अप्पा बळवंत चौक,
नूमवि प्राथमिक शाळेसमोर,
पुणे - ४११ ०३०
फोन नं. : ०२०-२४४५६२७०
मोबाईल नं. : ९४०४२४१७६१

**- मराठे प्रतिष्ठान, पुणे शाखा**

## नांदा सौख्यभरे

आपले कुलबांधव श्री. सदानंद तथा नंदकुमार दिनकर मराठे व सौ. शोभा सदानंद मराठे, कोल्हापूर यांचे ज्येष्ठ सुपुत्र चि. स्वानंद (पराग) यांचा शुभविवाह चि.सौ.कां. शिल्पा श्रीपाद खाडीलकर, कऱ्हाड यांची कनिष्ठ कन्या हीजबरोबर शुक्रवार दिनांक २८ मे २०१० ला सकाळी १० वाजून ३८ मिनिटांनी श्रीकृष्ण सरस्वती मंगल कार्यालय, कोल्हापूर येथे थाटामाटात झाला.

मराठे प्रतिष्ठानद्वारा नवविवाहितांना हार्दिक शुभेच्छा!

# पाईप गॅसची सुरस कथा

**- श्री. मोहन सदाशिव मराठे, (पृ.३६५)**

महाराष्ट्र टाईम्सच्या दिनांक १३जून २०१० च्या अंकात महानगर पाईप गॅसचा विस्तार धीम्या गतीने चालू असून काही ठिकाणी नोंदणी करूनही वर्ष दीड वर्षानंतर (ही) गॅसचे कनेक्शन मिळाले नसल्याच्या तक्रारी असल्याची बातमी आली. महाराष्ट्र टाईम्सला मी मला आलेला पाईप गॅसचा अनुभव ही सुरस कथा पाठविली. हितगुजच्या वाचकांसाठी ती पुढे देत आहे.

मी दिल्लीतील साखर संघाच्या प्रदीर्घ सेवेतून निवृत्त होऊन मुंबईत खारला माझ्या फ्लॅटमध्ये ५, रामभुवन, अहिंसा मार्ग, खार (प.) राहायला आलो. महानगर गॅसचे प्रतिनिधी पाईप गॅस घेण्यासाठी आमच्याकडे आले. त्याला प्रतिसाद म्हणून मी मार्च २००२ मध्ये रु.२५०० भरले. आज जून २०१० पर्यंत मला पाईप गॅसचा पुरवठा सुरू झालेला नाही. काही वर्षापूर्वी महानगर गॅसने गॅस पुरवठ्याचा पाईप माझ्या फ्लॅटच्या स्वयंपाकघराच्या भिंतीपर्यंत बाहेरून आणून ठेवला आहे. गॅसचा मीटर बसवलेला नाही.

सर्वात चीड आणणारी गोष्ट म्हणजे माझ्या जखमेवर मीठ चोळण्यासाठी मला गॅस वापराची बिले एप्रिल २००५ पासून आजतागायत नियमित येत आहेत. कंपनीला अनेक पत्रे पाठवली. अनेकदा फोन केले. एकतर फोन लवकर लागत नाही. लागला तर रेकॉर्डेड आदेशाप्रमाणे बटने दाबल्यावर ज्या व्यक्तीकडे फोन जातो त्या व्यक्तीने तो उचलून उत्तर मिळण्याचे नाव नाही.

एकदा कंपनीने बिलबाकी न भरल्यास गॅस कनेक्शन तोडले जाईल अशी नोटीस पाठवली. कंपनीला फोन केला. श्री. भावेश पोवळे नावाचे अधिकारी फोनवर भेटले. गॅस कनेक्शनच मिळाले नसल्याचे त्यांना सांगितले. त्यांनी एक माणूस घरी पाठवला. तो गॅस कनेक्शन नसल्याची खात्री करून गेला.

गॅस पुरवठ्याची बिले येणे चालूच राहिले. अनेकदा बिल आले की रक्तदाब वाढायचा. फोन न लागल्याने तो आणखीनच वाढायचा. मी गॅसचा प्रत्यक्ष ग्राहक नसल्याने ग्राहक संरक्षण कायदा मला संरक्षण देऊ शकेल की नाही याबद्दल माझ्या मनात संभ्रम आहे.

आता नियमित बिले येतात. ती न उघडता मी बाजूला ठेवतो. माझ्या सारख्या सामान्य व असामान्य, दोन्ही नसणाऱ्या व्यक्तीला महाराष्ट्र टाईम्स मधील वृत्ताने आशा निर्माण झाली. मी महाराष्ट्र टाईम्सच्या बातमीदाराला पत्र पाठवून धन्यवाद दिले. मला येणाऱ्या गॅस बिलातील गॅस प्रत्यक्षात वापरणाऱ्या ग्राहकाला मी शतश: प्रणाम केला.

टीप : महाराष्ट्र टाईम्सने माझे पत्र छापण्यापूर्वी महानगर गॅसकडे पाठपुरावा केला. ताबडतोब माझ्याकडे तीन अधिकारी धावत आले. ते गॅस पुरवठ्याची प्रत्यक्ष पाहणी करून गेले. सिस्टिम मधील दोषामुळे बिले येत होती. ती बंद होतील. मला शेजारच्या बिल्डिंगमधून (चालू असलेला) गॅस पुरवठा त्या सोसायटीच्या परवानगीने अथवा पावसाळा संपल्यावर रस्त्यावरून पुरवठा करण्याचे आश्वासन त्यांनी दिले आहे. पाहू या!

**- मोहन सदाशिव मराठे (पृ. ३६५)**
५, रामभवन, अहिंसा मार्ग, १४ए पथ,
खार (प.) मुंबई ४०० ०६२
दूरध्वनी : ०२२-२६४४३५१

## नांदा सौख्यभरे

आपले कुलबांधव कै. डॉ. कृ. द. मराठे यांचा नातू व श्री. केशव (विश्वास) कृष्णाजी मराठे (पृ. १२७) यांचे चिरंजीव आमोद यांचा शुभविवाह चि.सौ.कां. मानसी उदय थिटे (कोल्हापूर) हीजबरोबर गुरुवार, दिनांक २ सप्टेंबर २०१० ला सकाळी १० वाजून ४० मिनिटे या शुभमुहूर्तावर श्रुती मंगल कार्यालय, पुणे येथे थाटामाटात संपन्न झाला.

वधू-वरांना मराठे प्रतिष्ठानद्वारा शुभाशीर्वाद आणि शुभेच्छा!

आपले कुलबांधव कै. श्री. प्रमोद विष्णू मराठे व श्रीमती अर्चना प्रमोद मराठे (पृ.५१३) यांचा कनिष्ठ सुपुत्र चि. रोहित याचा शुभविवाह चि.सौ.कां. डॉ. पूर्वा मुकुंद कुर्तडीकर हिच्याबरोबर रविवार, दिनांक २७ जून २०१० ला सकाळी ११ वाजता रामचंद्र मंगल कार्यालय, औरंगाबाद येथे थाटामाटात संपन्न झाला.

नवविवाहितांना मराठे प्रतिष्ठानद्वारा शुभाशीर्वाद आणि शुभेच्छा!

आपले कुलबांधव श्री. अनंत वामन मराठे व सौ. अपर्णा अनंत मराठे (पृ.४००) यांची कनिष्ठ कन्या चि. सौ. कां. केतकी हिचा शुभविवाह चि. अभिजित श्री. वामन दत्तात्रय दामले यांचे सुपुत्र यांच्याबरोबर दिनांक ३१ जुलै २०१० ला सकाळी ९ वाजून १५ मिनिटांनी मनोहर मंगल कार्यालय, पुणे येथे थाटामाटात संपन्न झाला.

मराठे प्रतिष्ठानद्वारा नवविवाहितांना शुभाशीर्वाद आणि शुभेच्छा!

# प्रतिष्ठान वृत्त

प्रत्येक महिन्याच्या दुसऱ्या शुक्रवारी ४ वाजता कार्यकारी मंडळाची सभा होते. सभेच्या दिवशी कोणीही सभासद कार्यकारी मंडळाला भेटण्यासाठी येऊ शकतो. (मात्र येण्यापूर्वी कार्यवाहांशी दूरध्वनीवर संपर्क करून यावे म्हणजे सभेची जागा व दिवस यात बदल असल्यास समजेल व गैरसोय टळेल.)

शुक्रवार दिनांक २५ जून २०१० (वटपौर्णिमा)ला संध्याकाळी ४ वाजता श्री. रमाकांत विद्वांस (उपाध्यक्ष) माटुंगा यांच्या निवासस्थानी मराठे प्रतिष्ठानची बैठक भरली.

नेहमीप्रमाणे मागील सभेचे इतिवृत्त कार्यवाह श्री. हेमंत मराठे, नालासोपारा याने वाचून दाखवले.

आय-व्यय हिशेब... यावर चर्चा झाली. वास्तु-प्रकल्प इमारतनिधीसाठी पैसे वापरायचे असल्यामुळे गुणवत्ता पारितोषिके देण्यास स्थगिती देण्याचे ठरले. पॅन नंबर काढण्यासाठी प्रयत्न चालू असल्याचे अध्यक्षांनी सांगितले. श्री. सुशीलकुमार केशव मराठे (पृ.२४०) या बैठकीला उपस्थित होते.

---

शुक्रवार दिनांक १६ जुलै २०१०ला संध्याकाळी ४ वाजता मराठे उद्योग भवनात कार्यकारिणीची बैठक भरली. मागील सभेचे इतिवृत्त वाचून दाखवले. प्रतिष्ठानकडे आलेल्या पत्रव्यवहारावर चर्चा झाली. आय-व्यय ताळेबंदातील काही सुधारणा सांगितल्या गेल्या. वास्तुप्रकल्प निधीसाठी किती पैसे आहेत आणि किती गोळा करावे लागणार आहेत यावर विचारविनिमय झाला. 'हितगुज'विषयी चर्चा झाली. चहापानाने बैठक संपली.

---

रविवार दिनांक १ ऑगस्ट २०१०ला (लोकमान्य टिळक पुण्यतिथी) संध्याकाळी ५ वाजता वार्षिक सर्वसाधारण सभा दामले योग केंद्र सभागृहात, माटुंगा येथे भरली. कुलबांधवांची उपस्थिती बेताचीच होती.

कार्यवाहांनी अहवाल वाचून दाखविला. प्रतिष्ठानकडे आलेले पत्रव्यवहार त्यावर चर्चा झाली. 'हितगुज'चे स्वरूपासंदर्भात 'संपादकीय' लिहिणे आवश्यक नाही, ते नसले तरी चालेल अशी आग्रही भूमिका भूतपूर्व संपादक श्री. लक्ष्मणराव यांनरी मांडली. त्यावर चर्चा झाली आणि संपादकीय थोडक्यात लिहिले जावे असे ठरले.

कोषाध्यक्ष श्री. प्रभाकर मराठे आजारी असल्यामुळे या सभेला उपस्थित राहू शकले नाहीत. मिटिंगमध्ये काही महत्त्वाचे ठराव पास केले गेले. उपस्थित सदस्यांनी त्याला अनुमोदन दिले. श्री. मंदार भावे, चार्टर्ड अकौंटंट यांची हिशेब-तपासनीस म्हणून निवड केली गेली. त्यांना एक सहस्र रु. (१,०००रु.) मानधन देण्याचे निश्चित केले. कार्यकारिणीत काम करण्याची ज्यांची इच्छा असेल आणि जे कामासाठी वेळ देऊ शकतात त्यांना नवीन कार्यकारिणीत घ्यायचे असे ठरले. अध्यक्षांनी आपल्या भाषणात प्रतिष्ठान करीत असलेल्या कार्याचा थोडक्यात आढावा घेतला आणि वास्तूप्रकल्पाचे स्वप्न पूर्ण करण्यासाठी प्रयत्न सर्वांनी करावे असे सांगितले. त्याचप्रमाणे गुणवत्ता पारितोषिके न देण्याची भूमिका सांगितली. विद्यार्थी पारितोषिके घ्यायला उपस्थित राहत नाहीत. आजी-आजोबांजवळ पारितोषिके द्यावी लागतात, ही खंत व्यक्त केली. तसेच प्रतिष्ठान-कडे असलेला निधी वास्तू-प्रकल्पासाठी उपयोगात आणावा यासाठी बैठकीला जमलेल्या सर्व कुलबांधवांची सर्वसंमती अध्यक्षांनी मागितली.

श्री. मोहनराव मराठे, खार यांनी कर्नाटकात मराठे प्रतिष्ठानची शाखा स्थापन झाल्याचे सांगितले.

## हितगुज निधीस देणग्या

श्री. सदाशिव गोविंद मराठे, घाटकोपर, श्री. श्रीपाद यशवंत मराठे, डोंबिवली, श्री. विजय यशवंत मराठे, डोंबिवली, शिरीष मुकुंद मराठे, पुणे, श्री. पांडुरंग गोविंद मराठे, पालघर, श्री. चिंतामणी मराठे, कळवा, नलिनी लक्ष्मण गोगटे (मराठे), खार, मोरेश्वर चक्रदेव, विलेपार्ले, सुहास नारायण मराठे, ठाणे.

या देणगी दिलेल्या सर्व कुलबांधवांचे मराठे प्रतिष्ठानद्वारा आभार आणि धन्यवाद!

विशेष सूचना : हितगुज राखीव फंड निधी, देणगी शक्यतो चेकद्वारे 'मराठे प्रतिष्ठान' नाव लिहून संपादिकेच्या पत्त्यावर पाठवावी.

## मानसन्मान

श्री. श्रीनिवास केशव मराठे व सौ. शुभदा श्रीनिवास मराठे (पृ.२८८) यांची पुणे येथील कन्या सौ. धनश्री उदय गोखले यांचा पुत्र **कु. श्रेयस** उदय गोखले हा माध्यमिक परीक्षा मंडळाने (शालांत) मार्च २०१० मध्ये घेतलेल्या परीक्षेत ९५% गुण मिळवून उर्तिण झाला. कु. श्रेयस हा श्रीनिवास व सौ. शुभदा मराठे यांचा नातू आहे.

कुमार श्रेयसला संगणक व खगोलशास्त्र या विषयात विशेष गती व आवड आहे. शास्त्र पदवीपरीक्षेनंतर पदव्युत्तर अभ्यासासाठी वरीलपैकी एका विषयाची निवड करण्याचा त्याचा मानस आहे.

मराठे प्रतिष्ठानद्वारा कु.श्रेयसचे हार्दिक अभिनंदन! पुढील शैक्षणिक यशासाठी शुभेच्छा!

## राष्ट्रपतीपदकाचे मानकरी : एसीपी. श्री. विलास मराठे

गुंडांच्या अनेक कारवायांविरोधात आणि तपासात महत्त्वपूर्ण कामगिरी केलेल्या मुंबई पोलीस दलातील एसीपी विलास मराठे यांचा स्वातंत्र्यदिनी राष्ट्रपती पदकाने सन्मान करण्यात आला.

मुंबईवर दहशतवादी हल्ला करणाऱ्या कसाबवर आर्थर रोड जेलमध्ये खटला चालवण्यासाठी आवश्यक असलेली कडेकोट सुरक्षा व्यवस्था उभारण्यात एसीपी मराठे यांचा महत्त्वाचा सहभाग होता. १ जानेवारी ते १५ एप्रिल २००९ या अवघ्या साडेतीन महिन्यात आर्थर रोडचे लोखंडी बांधणीच्या कोटकिल्ल्यात रूपांतर करून आंतरराष्ट्रीय स्तरावर नावाजलेल्या खटल्यासाठी सुरक्षा उभारली गेली. नाशिकच्या महाराष्ट्र पोलीस अकादमीमधून सर्वोत्कृष्ट कॅडेटचा सन्मान मिळवून १९७७ मध्ये पोलीस सेवेत दाखल झालेल्या विलास मराठे यांनी सहकाऱ्यांना उत्तम सेवेचा आदर्श घालून दिला.

नागपाडा येथे रूजू झाल्यावर त्यांची गाठ पडली ती थेट दाऊदशी. तेव्हा मुंबईच्या गुन्हेगारी विश्वावर राज्य करणाऱ्या दाऊद आणि पठाण गँगमध्ये चकमक उडाली होती. तेव्हा दाऊदला 'ऑन द स्पॉट' अटक करण्याची धमक त्यांनी दाखवली. व्यापाऱ्याकडून एक कोटीची खंडणी मागणाऱ्या टोळीकडे भायखळ्यात स्वत: व्यापारी बनून जाणाऱ्या आणि हाणामारीनंतर गुंडांचे एनकाउंटर करण्याचे शौर्यही मराठे आणि त्यांच्यासोबत टॅक्सी ड्रायव्हर बनून गेलेल्या पोलीस हवालदाराने दाखवले. त्यासाठी मराठेंना राष्ट्रपतींकडून शौर्यपदक देण्यात आले.

एलटीटीईचा एलिंगो नटराजन याला सुप्रिम कोर्टात जन्मठेपेची शिक्षा झाली. त्याच्या तपासातही मराठे सहभागी होते. खून तसेच इतर गुन्ह्याच्या तपासात केलेल्या सातत्यपूर्ण चांगल्या कामगिरीची दखल घेऊन त्यांना १९९८ मध्ये पोलीस संचालक सन्मान चिन्ह देण्यात आले. गावदेवी पोलीस ठाण्याच्या सीनिअर पोलीस इन्स्पेक्टरच्या गाडीखाली बॉम्ब ठेवण्यापासून इतर ५२ ठिकाणी बॉम्बस्फोट केल्याचा आरोप असलेल्या डॉ. जलील अन्सारी याच्या तपासातही मराठे अग्रभागी होते. पंजाब पेटलेला असताना बँकांवर दरोडे घालून निधी पुरवणाऱ्या सुखवंत सिंगलाही शिक्षा होण्यासाठी त्यांनी काटेकोर तपास केला. पोलिसी तपासाबरोबर धार्मिक तेढ वाढू न देता शांततेत गणेशोत्सव पार पाडल्याबद्दल त्यांना मुख्यमंत्र्यांकडून गेल्या वर्षी महात्मा गांधी शांती पुरस्कार देण्यात आला.

**- रविंद्र मराठे, पुणे**

## सहवेदना

**डॉ. शाम विष्णू मराठे**, (पृ.४११) यांना दिनांक २०-७-२०१०रोजी देवाज्ञा झाली. अचानक दिनांक २६-६-२०१०पासून श्वसनाचा त्रास सुरू झाला आणि न्युमोनिया हे निदान सर्व प्रकारच्या मेडिकल टेस्टस्‌नंतर झाले. तीव्र स्वरूपाचा न्युमोनिया झाल्या कारणाने ट्रिटमेंटला प्रतिसाद ते देऊ शकले नाहीत. दिनांक ३०-६-२०१० रोजी के.ई.एम.रुग्णालयाच्या आयसीयूमध्ये ॲडमिट केले. २१दिवस तिथेच होते. व्हेंटिलेटरवर होते. परंतु उपचारांचा उपयोग झाला नाही व अखेर २०-७-२०१० रोजी सायंकाळी त्यांचे निधन झाले. आणि आम्ही सर्व कुटुंबीय दु:खात बुडालो.

डॉ. शाम विष्णू मराठे यांचा जन्म २-५-४५ रोजी झाला. शालेय शिक्षण नू.म.वि. व रमणबाग या पुण्यातील शाळांमध्ये झाले. अतिशय हुशार विद्यार्थी म्हणून गणले जायचे. संस्कृत व गणित उत्तम होते. पुढे दोन वर्षे फर्ग्युसन कॉलेजमध्ये सायन्सचे शिक्षण घेऊन टिळक आयुर्वेद महाविद्यायलातून बी.ए.एम.एस.ची (इंटिग्रेटेड कोर्स) ही वैद्यकीय पदवी मिळविली. त्यानंतर 'ॲनस्थेशिया' या विषयावर विशेष शिक्षण घेतले व ॲनेस्थेटिस्ट म्हणून ताराचंद हॉस्पिटल, भारती विद्यापीठ, महात्मा गांधी हॉस्पिटल, पुणे व इतर अनेक प्रायव्हेट हॉस्पिटल्समध्ये ॲनेस्थेटिस्ट म्हणून कार्य केले. अनेक विद्यार्थी तयार केले. त्यांचे करिअर उल्लेखनीय, वैशिष्ट्यपूर्ण होतेच परंतु अतिशय यशस्वीही होते. आज हजारो पेशंटस, विद्यार्थी, डॉक्टर मित्र यांच्या ते कायम स्मरणात राहतील.

शांत, मनमिळाऊ स्वभाव असल्याने त्यांनी सर्वांना जिंकले. मित्रपरिवार मोठा होता. आमच्या कुटुंबातील प्रमुख व्यक्ती असल्यामुळे सर्व जबाबदाऱ्या यशस्वीरितीने त्यांनी पार पाडल्या. आमचे व सर्व नातेवाईकांचे ते लाडके होते. त्यांच्या मृत्यूने सर्व हळहळले. मी त्यांची पत्नी, अर्धांगिनी म्हणून त्यांना सहाय्यभूत ठरले. माझ्या क्षमतेप्रमाणे जास्तीत जास्त सहयोग देऊन आजपर्यंत संसार केला, त्याचप्रमाणे वैद्यकीय व्यवसायही केला. आजही माझ्यासोबत ते आहेत असे मी मानते.

त्यांच्यामागे मी पत्नी डॉ. सीमा मराठे, मुली सौ. दीपा व शिल्पा, मुलगा प्रणव, सून सौ. श्रेया, जावई हर्षल व सारंग, अश्मिरा, अनुष्का, रेणुका या तीन नाती व देवव्रत हा नातू आहे.

त्यांच्या आत्म्याला शांती मिळो ही परमेश्वरास विनंती.

**- डॉ. सौ. सीमा मराठे, सौ. दीपा, शिल्पा, प्रणव, श्रेया, श्रीमती शांता व समस्त परिवार**

**सौ. विद्या वैशंपायन यांनी त्यांचे वडील श्री. वि. म. मराठे यांच्या अमृत महोत्सवाच्या निमित्ताने केलेली कविता सादर करीत आहोत.**
**श्री. विठ्ठल महादेव मराठे, सांगली यांना अमृतमहोत्सवात पंच्याहत्तरीत पदार्पण केल्याबद्दल मराठे प्रतिष्ठानद्वारे अभिष्ट चिंतन.**
**जीवेत शरदः शतम् ।। या शुभेच्छा.**

*ईशकृपेने मम पित्याची साजरी होते पंचाहत्तरी*
*या कृपेची बरसात होवो आस हीच अन्तरी*
*संधी नामी आज आहे व्यक्त करण्या कृतज्ञता*
*फेडण्याचा हा प्रयत्न पितृऋण अंशतः ।।१।।*

*शिक्षणासाठी ज्यांनी अपार कष्ट सोसले*
*अभियंता बनून त्यांनी बिऱ्हाड पाठी बांधले*
*स्विकारली निवृत्तीही जपत सचोटी, सत्यता*
*फेडण्याचा हा प्रयत्न पितृऋण अंशतः ।।२।।*

*रूक्मिणी समान पत्नी कष्टणारी माऊली*
*अडचणी आल्या जरी धरी सुखाची साऊली*
*साथ तिची अखंड मिळो येण्या जिवनी पूर्णता*
*फेडण्याचा हा प्रयत्न पितृऋण अंशतः ।।३।।*

*पुंडलिका समान पुत्र नाही जिथे काही उणे*
*सूनही आहे जणू* ****अश्विनातील चांदणे***
*घरामध्ये अखंड ठेवी झरा शांतिचा वाहता*
*फेडण्याचा हा प्रयत्न पितृऋण अंशतः ।।४।।*

*गाठली पंचाहत्तरी जरी तरुण मन आज ते*
*अनुभवाचे रंग घेऊनी त्यांची जीवन धारा वाहते*
*निर्मितीचा आनंद हा असाच राहो वाढता*
*फेडण्याचा हा प्रयत्न पितृऋण अंशतः ।।५।।*

*लेख, कथा, कविता कधी, कधी सभा संमेलने*
*समाज ऋण फेडताना जोडली त्यांनी मने*
*थक्क कुणीही आज होतो पाहून त्यांची व्याग्रता*
*फेडण्याचा हा प्रयत्न पितृऋण अंशतः ।।६।।*

*संस्काराची शिदोरी त्यांची घेऊन आम्ही चालतो*
*निरोगी दीर्घायुष्य लाभो तुम्हा ईश्वरास प्रार्थितो*
*जन्मो जन्मी आम्हा मिळो हेच रे माता पिता*
*फेडण्याचा हा प्रयत्न पितृऋण अंशतः ।।७।।*

* सूनेचे नाव अश्विनी आहे.

**- सौ. विद्या वैशंपायन (पृ. २३५)**
भक्ती अपार्टमेंट, विमल विहारच्या मागे,
बिबवेवाडी, पुणे - ४११ ०३७ फोन नं . २४२१६३७२

## नांदा सौख्यभरे

श्री. गजानन मराठे,(पृ.१२९) यांची मुलगी चि. सौ. कां. शीतल गजानन मराठे हिचा शुभविवाह दिनांक १२-८-२०१० रोजी पुणे येथे मित्रमंडळ सभागृहात चि. चिन्मय पद्माकर फाळके याच्याशी नोंदणी पद्धतीने झाला. वरील कार्यक्रमास संपूर्ण मराठे परिवार सदस्य, श्री. सतीश मराठे, अध्यक्ष सहकार भारती तसेच श्री. मिलिंद मराठे अध्यक्ष अखिल भारतीय विद्यार्थी परिषद तसेच पुण्यातील कार्यकारिणी सदस्य आशीर्वाद देण्याकरिता उपस्थित होते तसेच मराठे यांचे इतर सर्व नातेवाईक उपस्थित होते.

मराठे प्रतिष्ठानद्वारा नवविवाहितांना हार्दिक शुभेच्छा!



## मानसन्मान

आपले सोलापूर येथील कुलबांधव श्री. वसंत बाळकृष्ण मराठे (पृ.२७५) यांचा नातू चि. अमेय उमेश मराठे हा माध्यमिक शालांत बोर्डाच्या १०वीच्या परीक्षेत ९१.६४% गुण मिळवून उत्तीर्ण झाला.

मराठे प्रतिष्ठानद्वारा चि. अमेयचे हार्दिक अभिनंदन! पुढील शैक्षणिक वाटचालीत असेच भरघोस यश मिळो या शुभेच्छा!

## शैक्षणिक निधी देणगी

दिनांक ३१-७-२०१० रोजी श्रीमती वासंती वसंत मराठे, डी-३, चेतनानगर, औरंगाबाद यांनी कै. वसंत दत्तात्रय मराठे (पृ. २८०) यांच्या स्मृतीप्रीत्यर्थ शैक्षणिक निधीसाठी ५००१रु.च्या देणगीचा चेक मराठे प्रतिष्ठान, पुणे शाखेकडे दिला आहे.

देणगी दिल्याबद्दल मराठे प्रतिष्ठान आभारी आहे. धन्यवाद!

## लाचेची वाटचाल

- वि.म.मराठे (पृ.२३५)

लाच आणि भ्रष्टाचार होते बहीणभाऊ
दोघांमधे स्पर्धा असे किती खाऊ किती खाऊ
दोघामधे वाढण्याची स्पर्धा असे लागलेली
त्या मधील लाच कशी वाढली
त्याची कथा पुढे लिहिली
प्रथम प्रथम ती होती साधी सुधी
सहसा वापरली जात नसे
सभ्यपणाच्या मर्यादेत देणे घेणे बसत नसे
एखादी चिठ्ठी अगर निरोप कामासाठी पुरत असे
फार फार तर त्याला वशिला असे नाव असे
दिवस पुढे बदलले निरोप चिठ्ठी कालबाह्य झाले
आणि थोडीशी रक्कम पोटात घेऊन पाकीट चालू लागले
पाकीट देणारा घेणारा प्रथम प्रथम लाजत असे
कसे द्यावे कसे घ्यावे नवखेपणी माहीत नसे
आश्रया अशा वेळी एखादा सण येत असे
सणानिमित्त देवाण घेवाण सोयिची ठरत असे
दिवस जसे बदलले तसे पाकीट जुने झाले
मावून मावून किती मावणार हे आता लक्षात आले
पाकीटाला डच्चू दिला हँडबॅगने, तिचे पोट मोठे असे
ठरल्याप्रमाणे नोटांची बंडले सामावून ती घेत असे
कुणालाही संशय घेण्या किंचितही जागा नसे
सगळीकडे सुधारणा झाल्या हँडबॅग अपुरी पडू लागली.
तिची जागा घेण्या सुटकेस पुढे सरसावली
केबिनमधे जाताना हातातून न्यायची
परत येताना ती तेथे 'विसरायची'
जाताना असणार हातात परत येताना नसणार
गप्प केलेल्या शिपायाशिवाय कुणाला हे माहीत असणार?
आता म्हणे सूटकेसही गेली तिच्या जागी खोकी आली
लाचेच्या प्रगतीची अशी ही कथा झाली.

- वि. म. मराठे, (पृ. २३५)
पद्मश्री, महाराष्ट्र बँकेजवळ, विश्रामबाग, सांगली ४१६ ४१५
फोन : ०२३३-२३०००७२

## I Wish

I wish I am a sweet child little
Mom and pa spend a quality time, not a little
So good values are imbibed in me
I would be a worthy member of family tree.

I wish I am a cute grand child
To hold old hands with great care indeed
Transforming their lonely lives for the better
So they feel cheerful forever.

I wish to be a dark cloud great
Showering rain at the required rate
There will be Lush green at every sight
Farmer leads a comfy life full of dazzling light.

I wish I would be a colourful plant smaller
To bear delicious fruits with beautiful flowers
Their aroma spreads everywhere
Making pleasant passing O weary traveller.

I wish I am an enthusiastic birdie
My friends call me a sweet chirpy
Crossing all the possible geographical baoundaries
Conveying only peaceful message to all countries

I wish I could be a scientist inspiring
With mission to handle goodwill projects encouraging
There has to be proper use of intelligence
Whole world lives not a life of negligence

I wish I am a sincere fellow
To serve my very dear country fellow
I want to see my Mother Earth Happy
By undertaking every task with honesty!

Composed by : **Shyamala Purandare (Jail),**
27 B Vrindavan, Pachavati,
Pashan, Pune - 411 008.
Phone : 020-25898534
Mobile : 9403625724

# उगवता तारा

**डॉ. सौ. सुमेधा प्रभाकर मराठे (पृ.१२०)**

"आई मी आलोऽऽ मला खूप भूक लागली आहे. खायला दे काही तरी आणि गरमागरम चहा दे लौकर" आदित्यने शाळेतून येताच आईला जोराची ललकारी दिली. भंगारवाल्यापुढे घरातील जुने टाकाऊ सामान टाकून द्यावे तशा दप्तर, बूट, मोजे, युनिफॉर्म इत्यादी शाळेच्या नकोशा वाटणाऱ्या सर्व उपाधी घाईघाईने काढून टाकून दिल्या.

मीराने म्हणजे आदित्यच्या आईने त्याला आवडणारा खास गोडाचा शिरा खायला केला होता. आदित्य शाळेतून आला आणि घर एकदम बोलकं झालं. मीरा नोकरी करत नव्हती. त्यामुळे घरीच असायची. तिला काव्य-शास्त्र-विनोद, संगीत या सगळ्यांची आवड असल्याने वेळ कसा घालवावा हा प्रश्नच राहत नसे. 'श्याम'ला म्हणजे आदित्यच्या बाबांना नोकरीवाली वधू नकोच होती. नोकरी न करणाऱ्या मुलीशी लग्न करीन असा त्यांचा आग्रह होता. नोकरी म्हणजे दुसऱ्याची ताबेदारी, कोणाची तरी गुलामगिरी, नोकरी करून पैसे मिळतात खरे, पण त्यापासून मिळणारे सुख उपभोगायला वेळ तरी कुठे असतो? सकाळपासून रात्रीपर्यंत राबायचे, घाईघाई जन्माला पुरलेली, निवांतपणा कसा तो तोंडी लावण्याइतकासुद्धा नाही या सर्वातून उसंत मिळेल तर शपथ!

.. आणि त्याला त्याची मुले 'पाळणाघर' नामक कोंडवाड्यात ठेवणे अजिबात पसंत नव्हते. मुले कशी राजवाड्यात असल्यासारखी राहिली पाहिजेत. लाड, कोडकौतुकात भिजलेली. प्रेम, माया, आपलेपणा, मोकळेपणा त्यांच्या वाट्याला भरपूर आला पाहिजे. तिन्हीसांजा किंवा रात्री घरी न्यायला येणाऱ्या चातकासारखी वाट पाहणाऱ्या -- पाळणाघरातील मुलांचे अकालीच सुकलेल्या फुलांसारखे कोमेजलेले चेहरे पाहून त्याला गलबलल्यासारखे होई. तो फार हळवा आत्रण संवेदनाक्षम होता.

तो नेहमी मीरला म्हणायचा, "हे बघ, मीरा जगाच्या इतिहासत गमावलेली साम्राज्येही जिंकून परत घेता येतात. विज्ञानाच्या जोरावर कदाचित भविष्यात मानव आकाशातील तारेही पृथ्वीवरील संग्रहालयात आणून ठेवू शकेल, परंतु मानवी इतिहासात, माणसाला गेलेला क्षण कधी परत आणता आलेलान नाही, आणता येणार नाही! आपले तरुणपण कायम राहणार नाही, तेव्हा येणारा प्रत्येक क्षण सुख उपभोगायच्या लाखमोलाचा आणि आपल्या मुलांचे लहानपण पुन्हा येणार नाही. तेव्हा त्यांना निरागस मनमुराद जगू द्यायचे. आपल्या मुलांची कोवळ मने आपणच जपली पाहिजेत. त्यांना चांगले संस्कार आपल्या कृतीद्वारे केले पाहिजेत. तोंडी कोरडेपणाने किंवा पढित पांडित्याने नव्हेत. आपल्या चांगल्या वागण्याचा वस्तुपाठ आदर्श मुले ठेवत असतात.

दुधात साखर विरघळली की ती दिसत नाही, पण ती त्यात असते. तिच्या गोडव्यामुळे तिचे अस्तित्व जाणवते. श्यामच्या संसारात मीराचे अस्तित्व असे होते. तिला श्यामचे हे विचार पटायचे. ती शिकलेली होती. समजूतदार होती. मिळेल त्यात समाधानाने राहायची दुरापास्त कला तिला साधली होती. संसार टापटिपीने, काटकसरीने, सुभगतेने करीत होती.

नोकरी करण्याचा वडाखुळा हट्ट तिला कधी करावासा वाटलाच नाही. पूर्वी अनेकदा दाराशी चालून आलेल्या नोकऱ्या तिने अंगावरून झुरळ झटकावे तशा झटकून टाकल्या होत्या. ती चांगली शिकलेली असून नोकरी करत नाही याचे तिच्या मित्रमैत्रिणींना, नातेवाईकांना खूप आश्चर्य वाटायचे आणि ती त्यांची कीव करायची. नोकरी करूनच स्त्रियांना आर्थिक स्वातंत्र्य मिळते, स्त्रीमुक्ती होते, त्यांचा वेळ चांगला जातो असल्या भोंगळ कल्पनांवर तिचा विश्वास नव्हता. स्वत:चे 'करिअर' करते म्हणजे नेमके काय करते हे तिला अजून समजले नव्हते.

दुपारी घरकाम, जेवण आटोपल्यावर ती एखाद्या राणीच्या दिमाखात पलंगावर आडवी पडून आराम करीत असे आणि पेपर चाळता चाळता झोपेला कुशीत घेत असे. झाडाला पाणी घातल्यावर ते जसे प्रफुल्लित होऊन डोलारयला लागते तशी थोडी निवांत झोप झाल्यावर ती ताजीतवानी व्हायची. मुलं आणि श्याम घरी यायच्या आत घरकाम आवरून ठेवायची, चांगलंचुंगलं खायला करून ठेवायची.

आज आदित्यच्या आवडीचा शिरा तिने केला होता. पण तो खाण्यात त्याचे लक्ष नव्हते. एरवी चवीने, रसिकतेने मिटक्या मारत खाणारा आदित्य घाईघाईने, कसाबसा केवळ आईसाठीच पोटात शिरा ढकलत होता. आगगाडीच्या इंजिनात कोळसे ढकलावे तसा.

'आदित्य शिऱ्यावर चहा अगोड लागेल म्हणून थोडा चिवडा देऊ का फक्की मारायला?" मीराने विचारले. पण त्याच्या कानात शिरले नाही. नेहमी कपातून हळूहळू घुटके घेत चहा पिणाऱ्या आदित्यने चक्क बशीत चहा ओतून झटकन प्यायला.

"कसली एवढी घाई झालीये आदित्य? खाण्यापिण्याचे काही सुचत नाहीये तुला?"

"अग आई, होळी जवळ आली आहे ना, होळीची तयारी करायची घाई आहे. गच्चीवर मित्रमंडळी जमणार आहेत, विसरलीस वाटतं?"

"हं! मग बरोबर... लक्षातच राहिले नाही माझ्या!" कपबशी विसळता विसळता मीरा पुटपुटली.

आपल्या हिंदू संस्कृतीत सणांना विशेष महत्त्व आहे. सणहे आपल्या मनाला उभारी आणतात. निराशेचे, दुःखाचे वातावरण विसरायला लावू माणसाला आनंददायी बनवितात. माणूस हा मुळातच उत्सवप्रिय आहे. त्यामुळे तो धुमधडाक्याने सण साजरे करतो. या सणांतून माणसाच्या रसिक, आनंदी मनाचं प्रकटीकरण होतं. लहान, थोर, सर्वजण सणांमध्ये आनंदाने सामील होताना दिसतात.

आदित्यच्या कॉलनीतील मुलेही दरवर्षी होळी साजरी करायचे. त्यासाठी ते कॉलनीत राहणाऱ्या रहिवाशांकडून वर्गणी गोळा करायचे. आदित्य एखाद्या वारा प्यायलेल्या वासरासारखा आनंद, चैतन्य यांनी नुसता उंडारायचा. त्याच्या मनात उत्साहाचे वारे भरून अंगात एवढे बळ संचारायचे की होळीचा एवढा मोठा खड्डा तो एकटा खणून टाकायचा. मित्रांची वाट न पाहता! विठ्ठलभक्त वारकऱ्याला आषाढी एकादशीचे पंढरीचे वेध जसे लागतात, तसे या मुलांना होळीचे वेध लागलेले असायचे.

होळी कशी साजरी करायची, होळी कशी सजवायची. झेंडूच्या फुलांचा हार घालायचा, गाठीच्या माळा (रंगीबेरंगी साखरेची पदके या माळेत ओवलेली असतात. लहान मुलांच्या गळ्यात ह्या माळा घालून शितळ शिमगा साजरा करतात.) किती घालायच्या, कॉलनीच्या आसमंतात फिरून लाकडे, काटक्या गोळा करायच्या. शेणाच्या गोवऱ्या, गवत कुठे चांगले मिळते ते विकत घेऊन साठवून ठेवायचे, कोणाची आई रांगोळी सुंदर काढते ते ठरवायचे. नारळ किती आणायचे, पेढे, साखरफुटाणे, बत्तासे किती आणायचे, प्रसाद कसा वाटायचा, पैसे किती वर्गणीतून जमवायचे यांसारख्या अनेक विषयांवर मीटिंगमध्ये चर्चा व्हायची.

गेल्या वर्षीच्या तुलनेत चांगली भक्कम वर्गणी जमली होती म्हणून आदित्यच्या मित्रमंडळींमध्ये विशेष आनंदाचे वातावरण होते.

हिशेब, जमा-खर्च करून होळीचा लागणारा खर्च जाऊन, पैसे शिल्लक राहत होते. त्याचे काय करायचे? श्रमपरिहारासाठी 'मस्त पार्टी' करायची; (वडा-पाव, भेळपुरी, सँडविच, आईस्क्रीम, कोल्ड्रिंक इ. पदार्थांचा समावेश असलेली) अशी टूम मोठ्या उत्साहात निघाली. पार्टीचा हिशेब खर्च जाऊनही पैसे उरले होते. तेव्हा आदित्यचा मित्र सागर म्हणाला, ''अरे आपण या पैशांतून प्रत्येकाला बॅट-बॉल आणू या का?''

''हो, हो. गुड आयडिया! वंडरफूल! एखादा पिक्चरही बघू थिएटरमध्ये जाऊन'' सर्व मित्रांनी सागरच्या सुरात सूर मिसळला. एकटा आदित्य काही बोलला नाही. त्याचा गंभीर चेहरो, नाराज झालेला पाहून ''काय रे आदित्य, तुला काय झाले? चेहरा उभट करून गप्प बसलास तो?''

''तुला सागरची व आम्हा सर्व दोस्तांची कल्पना आवडली नाही का? तू आमच्या म्हणण्याला दुजोरा दिला नाहीस? पिक्चरला तुझी आई पाठवणार नाही का? पण बॅट-बॉल तर घ्यायला काय जातंय?''

''लोकांनी होळीसाठी म्हणून आपल्याला दिलेल्या पैशांतून बॅट-बॉल आणणे मला गैर वाटते. चुकीचे आहे ते. योग्य नाही वाटत. माझा तुमच्या या कल्पनेला पाठिंबा नसून विरोधच आहे.'' आदित्यने आपले स्वच्छ मत नोंदवले आणि तो सरळ घरी आला. पण काही बोलला नाही. मित्रांनी त्याची केलेली हेटाळणी याविषयीही गप्प गप्प होता. त्याच्या कोवळ्या चेहऱ्यावरील काळजीने म्लान झालेले भाव मीराने ओळखले. थुई थुई उडणारे कारंजे अचानक अबोल का झाले? आदित्यचे काहीतरी बिनसले आहे. एरवी हा होळीच्या मीटिंगविषयी किती भरभरून बोलत असतो. एखाद्या सुजाण, पोक्त, मोठ्या माणसासारखा आणि आज मात्र मौन!

अखेर न राहवून मीराने विचारले, ''काय रे, आदित्य तुझा चेहरा असा पडलेला का दिसतो? कोणी काही तुला उलट-सुलट बोललं का? की भांडण झाले मित्रांशी?''

## वाचकांचा पत्रव्यवहार

'हितगुज' मिळाला. वाट पाहतच होतो. अंक आल्यानंतर त्वरित आमचे घरी मराठे परिवाराची सांगली, मिरज, विश्रामबाग परिसराची सभा दिनांक २५.७.१० रोजी रविवारी झाली. प्रतिसाद साधारण म्हणजे फक्त सांगली, विश्रामबाग याच परिवाराचा होता. गप्पा, चर्चा, परिचय झाला. सभा साधारणपणे १ तास झाली. खूप बरे वाटले. मराठे मंडळी एकत्र आली याचे समाधान झाले. असो.

'हितगुज'मधील ठळक व उल्लेखनीय लेख पुढीलप्रमाणे : १. अनासक्त कर्मयोगी. दामोदर हरि मराठेंविषयी लेख वाचला व क्षणभर शांत बसलो. लेख ....तीनदा वाचन केले व असे आदर्श आपण थोडेफार आत्मसात केले तर त्यांना खरी श्रद्धांजली होईल असे मनात भरून आले. कर्मयोगीचे आयुष्य हे खऱ्या अर्थान सार्थकी झाले

२. माणुसकीचा महापूर एक ... व मनास भावणारा लेख अनुभव.

३. आईचे मुलास म्हणजे सं... लिहिलेले पत्र खूपच आत्मचिंतन करणारे व खरंच प्रत्येक मुलामुलींनी पत्र वाचून चिंतन करणारे व कृत्रिम उतरवणारे पत्र. धन्यवाद.

अक्षर ओळखून सावकाश वाचावे.

- **श्री. भास्कर दत्तात्रेय मराठे,** मोरया, ब्लॉक ३७, सह्याद्रीनगर, मिरज, जि. सांगली ४१६४१०

### मानसन्मान

कुमारी मैथिली शिरीष मराठे, पुणे ही माध्यमिक शालांत परीक्षेत ९३.४५% गुण मिळवून यशस्वी उत्तीर्ण झाली.
मराठे प्रतिष्ठानद्वारा कु. मैथिलीचे हार्दिक अभिनंदन! पुढील शैक्षणिक वाटचालीत असेच भरघोस यश मिळो या शुभेच्छा!

दूध ऊतू जाताना एकदम वर उफाळून यावे तसा त्याला सात्विक संताप अनावर झाला आणि ताडकन तो म्हणाला, ''मी त्यांच्यात होळी खेळायला जाणार नाही.''

''पण का? कारण काय?'' मीराने आश्चर्याने विचारले.

''अग आई, होळीसाठी अनेकांकडून घेतलेल्या पैशांतून माझे सर्व मित्र प्रत्येकाला बॅट-बॉल आणणार आहेत. मला ते आवडत नाही. लोकांनी होळीसाठी दिलेले पैसे स्वत:साठी वापरण्याचा आम्हाला काय अधिकार आहे? म्हणून नाईलाजाने, निरुपायाने मी होळीत सहभागी होऊ का नको असा मला प्रश्न पडला आहे.''

आनंदाने खळाळून वाहणाऱ्या निर्झराचा प्रवाह एकदम आटल्यासारखा झाला. त्याला मनातून तर होळी साजरी करायची होती. त्यासाठी पुष्कळ कामे त्याने आवडीने केली होती. पण मित्रांच्या या अशा वागण्यामुळे त्याची खुशी किरकिरली. तो अस्वस्थ झाला.

''आई, तू या मित्रांना हे सर्व पटवून देशील का? त्यांना बॅट-बॉल आणण्यापासून परावृत्त करशील का? त्यांची चांगली समजूत घालून, पैशाचा हिशेब ठेवून त्याचा योग्य विनियोग कसा करायचा हे सांगशील का?''

''मी माझ्या परीने सर्व मित्रांना हे पटवून देईन. पण तुला वाटतंय ते माझं ऐकतील म्हणून?'' मीराने विचारलं आणि तसा मनापासून प्रयत्नही करून पाहिला. पण नापिक जमिनीत बी कसे रूजणार? खडकावर पाणी पडले की ते फुकट जाते तसेच याचे झाले. आदित्यच्या आईला त्यांना समजवण्यात यश आले नाही. उलट सर्व मित्रांनी आणि त्यांच्या पालकांनी 'त्यात काय झालं बॅट-बॉल आणला म्हणून? असा सूर लावून या मायलेकरांना 'वेड्यात' काढलं.

रेसकोर्सवरच्या घोड्यालाही शर्यतीत मागे टाकतील इतक्या वेगाने मीराच्या मनतील विचार दौडू लागले. पण या घोड्याच्या टापांचा आवाज कोणाला ऐकू जाणार होता?

होळीत सहभागी झालेली सर्व मुले आर्थिक-दृष्ट्या श्रीमंत, संपन्न घरातील, भरपूर लाड केल्या जाणाऱ्या घरातील होती. तरी त्यांना बॅट-बॉल आणावासा वाटला. तोही वर्गणीच्या पैशातून! एकच आदित्य अपवाद निघाला. तिला या ठिकाणी आदित्यचे उठून दिसणारे वेगळेपण जाणवलं. मुलाचे पाय पाळण्यात दिसतात. मीराला त्या क्षणी आदित्यचे फार कौतुक वाटले आणि अभिमानही! आणि दुसऱ्याच क्षणी, कौतुकाची जागा काळजीने व्यापली. खरंच त्याची ही इतकी चांगली वृत्ती पुढे मोठा झाल्यावर अशीच राहिल का? की तोही प्रलोभनांना, मोहांना बळी पडेल? आणि समजा सुदैवाने त्याची ही वृत्ती अशीच चांगली, स्वच्छ राहिली तरी भ्रष्टाचार हाच शिष्टाचार मानणाऱ्या लाचखाऊ दुनियेत त्याचा निभाव कसा लागेल? सार्वजनिक क्षेत्रातील पैसा खाजगीकरणासाठी, वैयक्तिकतेसाठी वापरणाऱ्या, पिढ्या न् पिढ्या संपत्ती साठवणाऱ्या सत्ताधाऱ्यांच्या सरकारात याचा टिकाव कसा लागेल? पैसे खाण्याच्या फैलावत जाणाऱ्या रोगाची लागण तर याला लागणार नाही? चिंतेने मीराच्या मनात घर केलं.

प्रवाहाच्या विरुद्ध त्याला पोहता येईल का? की लाचखाऊंच्या गटारगंगेत हात कोरडे ठेवणे कठीण, जिकिरीचे काम होऊन बसेल.

मग तिच्या लक्षात आलं, पिढ्यान् पिढ्या उत्तम अशा विचारधनांवर, संपन्न संस्कृतीत रूजलेली ही संस्कारांची पाळंमुळं अशी कोणालाही उपटून टाकता येणार नाहीत. ह्या चांगल्या प्रवृत्ती कायम त्याची समर्थपणे सोबत करू शकतील.

लाच खाण्याच्या फैलावत जाणाऱ्या रोगाच्या साथीला हा बळी पडणार नाही असा ठाम विश्वास तिच्या मनात निर्माण झाला. तिची आशावादी वृत्ती जागी झाली.

''प्राप्तकाळ हा विशाल भुधर संदर लेणी तयात खोदा'' किंवा कुसुमाग्रजांच्या 'रात्रीच्या गर्भात असे उद्याचा उष:काल' या कवितेच्या ओळी अचानक तिच्या ओठावर गुणगुणू लागल्या. आज ती समाधानाने झोपणार होती.

शांत चित्ताने ती घराबाहेरच्या मोठ्या बाल्कनीत येऊन उभी राहिली. सहजच तिचे लक्ष वर गेले.

काळे ढग नाहीसे होऊन आकाश स्वच्छ झाले होते. त्यातून निर्मळ विचारांची, शुद्ध चारित्र्याची बरसात होत होती. आशेच्या चांदण्या चमकत होत्या. आणि आकाशात एक तेजस्वी, लखलखता तारा उगवला होता, त्याचे तेज सर्व दूर पसरले होते.

आणि तिनं आदित्यला बोलावले. जवळ घेऊन कुरवाळले. आत्मविश्वासानं त्याची पाठ थोपटली.

त्याला म्हणाली, ''आदित्य, तुझे म्हणणे बरोबर आहे. तू त्या मुलांच्यात होळीसाठी जाऊ नकोस. बॅट-बॉल घेऊ नकोस. मी तुझ्याच मताची आहे.''

**- डॉ. सौ. सुमेधा प्रभाकर मराठे**
(संपादिका : हितगुज - मराठे प्रतिष्ठान)
८/१३, सहकार नगर, वडाळा, मुंबई ४०० ०३१
दूरध्वनी : ०२२-२४१५०८८९

*जिवनाला (जीवनाला) अर्थ हवा।*
*संगिताला ताल हवा।*
*नाटकाला प्रेक्षक हवा।*
*वक्त्याला श्रोता हवा।*

*घराला घरपण हवे।*
*दाराशी वृंदावन हवे*
*माणसाला माणुसकी हवी।*
*प्रेमाला मायेची झालर हवी।*

*प्रतिमेला प्रतिभा हवी।*
*रसिकांची दाद हवी।*
*जाणकाराला जाण हवी।*
*मनाला आनंदीवृत्ती हवी।*

*हवेहवेसे वाटणारे हे क्षण।*
*क्षणार्धात विरून जावे।*
*पांडुरंगाशी समरस होऊन।*
*गीत त्याचे गात राहावे।*

**- सौ. सुहासिनी नारायण मराठे,**
**(पृ. १८),** मराठेवाडा, पारनाका, कल्याण,
जि. -ठाणे दूरध्वनी : ०२५१-२०८४६४

**नकार देणं ही कला असेल,**
**पण होकार देऊन**
**काम न करणे**
**ही खरी कला!**

## ग्रामीण गणेशोत्सव (चाल : पिवळे तांबूस ऊन कोवळे...)

आज आम्ही ते रंगून जाऊ गणेश-भक्तीने
पुरवा हेतू भक्तगणाचे तुझ्याच शक्तीने ॥१॥
मूर्तीवरती माटी करती आम्रपर्ण बांधती
लाकडीच ती फळे खोउनी रानफुले लोंबली ॥२॥
कुणा घरी ती मोठी मूर्ती कुणा घरी छोटी
देवापुढं आरास करोनी देखावा करती ॥३॥
तुझ्यापुढे ही मुले गोजिरी तुझ्यापुढे मागती
तुझ्या करीचे मोदक बघुनी आईला सांगती ॥४॥
घरोघरी ते दर्शन घेऊन मुले बेल वाहती
त्याना ठाऊक काय तुला त्या दूर्वा प्रिय होती ॥५॥
न्हाऊन माखुन रंगित कपडे घालुन ते फिरती
तुझ्या रूपाचे दर्शन घेता पंचखाद्य कोंबती ॥६॥
तुझी आरती करून फिरती, रात्री घरि जाऊन
मोदक लाडू करंजी पुढे पळे शिर्णी खाऊन ॥७॥
रात्री भजनी रंगी रमला वाडीतील घोळका
उसळ खाऊनी चहा ढोसुनी पुन: पुन: खा खा ॥८॥
भजनी होते काही थोडके गायक शेजारचे
कुणा पाडुनी भजनी, अपुली प्रौढी सांगायचे ॥९॥
भजनी असता रंगुन जावे, भक्तिभाव मानसी
त्याच्या विरही भजनी गाता फुकाफुकी गायकी ॥१०॥
स्पिकरा पुढती गळा तोडुनी गायक जे गाती
गणेश-घर ते लांब असावे ऐसे ते मानती ॥११॥
फटाकड्याही मधून फुटती बाण लांब सोडती
चंदर-ज्योती त्या नभी टाकुनी बाल मने खेळती ॥१२॥
फटाकड्यांची आतषबाजी प्रेक्षणीय दिसती
नारिंगांचा छान फवारा मुले मधे लावती ॥१३॥
लुगडी-परकर लेऊन युवती फिरती गमतीन
फुगडी घालून लोकगीतें ती गाती समजून ॥१४॥
मुले अंगणी एक फुगेटी दरवेळी फोडती
कुणी पिस्तुले भुइचक्रादी खेळ नवे मांडती ॥१५॥
गंध-शेंदुरे उटी लाऊनी हार-तुरे वाहती
कर्पुर-धूपा तुला दाऊनी नैवेद्या अर्पिती ॥१६॥
मनातल्या त्या अपुऱ्या इच्छा तुझ्यापुढे मांडती
तया पूर्तता करण्या - हेतु तुलाच ये जागृती ॥१७॥
कुठे धूर तो फटाकड्यांचा, कुठे धूप-वास
प्रत्येकाचे खेळ निराळे, शैली तर खास ॥१८॥
रावरंकचा उत्सव भारी चिंता त्या नसती
कर्ज काढुनी रंग उधळती उत्सवात नाचती ॥१९॥
विसर्जनाचे दिवशी येते डोळ्यांतुन पाणी
पुढील वर्षी लवकर यावे श्रीनिवास मागणी ॥२०॥

**रचयिता : श्री. श्रीनिवास कृ. मराठे, हंसापूर**

## Congratulations

My brother **Shashank Shyam Marathe** (S/o Shri. Shyam Yashwant Marathe, Belgaum) has successfully completed BCA (Bachelor in Computer Applications) graduation course from GSS College, Belgaum affiliated to Karnataka University Dharwad. His aggregate percentage is 77.34. He will be pursuing MCA (Master in Computer Applications) after this.
Our communication address has changed.
Hearty Congratulation from Marathe Prathishan!
Our new address is as below.
**Shri. Shyam Yashwant Marathe,**
CTS No. 1447, "Ashraya" 2nd Floor, Shambhu Complex, Basavan Galli, Belgaum, Karnataka - 590001

## आजन्म ऋणी

माझी आई एक आदर्श माता आणि पत्नी होती. तिचा जन्म सांगली जवळच्या वाटेगाव या खेड्यात झाला. त्यांच्या घरी फार धार्मिक वातावरण होते. वयाच्या १९व्या वर्षी तिचं लग्न झाला. माझे वडील, विष्णू मराठे यांच्याशी झाले. वडील सिव्हिल इंजिनिअर होते. त्यांची नोकरी रेल्वेत असल्याने मनमाडला होते. वाटेगावसारख्या खेड्यातून आई मनमाडला आली. मनमाडहून गिरगाव नंतर माटुंगा आणि मग वांद्रे इथे स्वत:च्या मालकीच्या इमारतीत वास्तव्य.

या सर्व स्थलांतरामध्ये तिच्या जीवनात अनेक कठीण प्रसंग आले. पण ती डगमगली नाही. आपल्या पतीच्या व्यवसायातील चढ-उतारांमध्ये सर्व संकटांना तिने धैर्याने तोंड दिलं. आमचं राहतं घण वाचवण्यासाठी तर तिने आपले सगळे दागिने वडिलांसमोर ठेवले. त्यावेळी तिने केलेला त्याग आणि कष्ट मी विसरूच शकत नाही. आमच्यासाठी तिने हे केलं नसतं तर मुंबईसारख्या शहरात आम्ही कुठे गेलो असतो, याची कल्पनाच करू शकत नाही. खरंच, 'आई थोर तुझे उपकार!'

- **श्री. सदानंद मराठे, (पृ.४१७)**

महाराष्ट्र टाइम्स दिनांक ९ ऑगस्ट २०१० वरून साभार.

१९६३ साली गोल्ड कंट्रोल कायदा आला आणि यशवंतरावांना दुकान बंद करण्याशिवाय दुसरा मार्ग दिसेना. हे दुकान उभे करण्यातले वडिलांचे कष्ट आनंदरावांनी बघितले होते. त्यामुळे दुकानात गुंतलेल्या वडिलांच्या भावनांची आनंदरावांना पूर्ण जाणीव होती, तर दुसरीकडे नोकरीत असणाऱ्या अनेक संधी व त्याबरोबर येणारे पैसे. पण शेवटी भावनांनी पैशावर मात केली आणि डबघाईला आलेल्या व्यवसायात आनंदरावांनी धाडसाने उडी घेतली. अनेक आर्थिक अडचणी होत्या, पण मुलाच्या आधारामुळे वडिलांच्या चेहऱ्यावर दिसणारे समाधान बरंच काही देऊन जात होते.

१९६५ साली गोल्ड कंट्रोल रिलॅक्सेशन आले आणि आता मात्र व्यवसायाची घडी चांगली बसू लागली. कोपिनेश्वराजवळचे मराठ्यांचे दुकान नावारूपाला आले होते. पुढे आनंदरावांची लहान भावंडे विलासराव व विश्वासराव ही पण व्यवसायात मोठ्या भावाला मदत करू लागली. विलासरावांनी बी.कॉम. नंतर सी.ए.करण्याचा निर्णय घेतला. का तर दुकानाचे पैशाचे व्यवहार पाहायला घरातीलच एक प्रशिक्षित व्यक्ती असावी हा हेतू. ही तीनही भावंडं दुकानात जशी एकत्र काम करायची तशीच त्यांची घरीदेखील एकत्र कुटुंबपद्धती होती. सर्वांची मुलं एकत्र वाढल्याने त्यांच्यात एकोपा आहे. आनंदरावांच्या वडिलांशी आनंदरावांचे व त्यांच्या भावंडांचे जसे बंध होते तसेच पुढच्या पिढीमध्येही ते निर्माण झाले. पूर्वीसारख्याच चर्चा, गप्पा, वादविवाद डायनिंगटेबलावर रंगू लागल्या.

आनंदरावांचा मुलगा सीझनच्या वेळी दिवाळी, नवरात्र यावेळी मदतीसाठी जाऊ लागला. पण याच मंदारने पदवीधर झाल्यावर वडिलांकडे याच व्यवसायात येण्याची इच्छा व्यक्ती केली तेव्हा आपल्या मुलाला त्यांनी अट घातली की त्याने दागिने घडविण्याचे प्रशिक्षण घेतले पाहिजे. आता मंदार दिवसभर कारागिरांच्या हाताखाली कारागिरी शिकू लागला. त्याचे हात जसे दागिने घडवायला सरावले तेव्हाच त्याला दुकानाच्या पुढच्या काऊंटरवर यायची परवानगी आनंदरावांनी दिली. मंदारप्रमाणेच त्याच्या इतर भावंडांनी या व्यवसायात प्रवेश करायचे ठरविले. तेव्हा त्यांना सी.ए.झाल्यावर, जेमोलॉजी झाल्यावरच प्रवेश मिळाला. हे सर्व व्यवसाय वाढीला पूरकपण आणि घरचेच; हा दृष्टीकोन होता. हे सर्व करत असताना मुलं नवनव्या जबाबदाऱ्या पार पाडत होती आणि आपले छंदही जोपासत होती. मंदारला ट्रेकिंगची आवड आहे. तो वर्षातले दोन-एक महिने जंगलात भटकत असतो. तीच आवड मंदारच्या मुलाला आहे. अवघ्या चार-साडेचार वर्षाच्या मैत्रेयला बऱ्याच पक्ष्यांची, प्राण्यांची नावे माहिती आहेत. जंगलात गेल्यावर कसं वागायचं, बोलायचं याची जाणही चांगलीच आहे. त्याचप्रमाणे त्याची चित्रकला व हस्ताक्षरही छान आहे अगदी त्याच्या आईसारखे. घरातली मंडळी त्याची छंदांशी ओळख करून देतात. पण मागे मात्र लागत नाहीत. निसर्गाच्या सान्निध्यात आल्यावर जे शिक्षण मिळतं ते शाळाही कदाचित देऊ शकणार नाही. मैत्रेयला आपोआपच त्याच्या जडणघडणीतून, संस्कारातून हे मिळतंय. व्यवसायाबरोबरच छंदही आपल्याला खूप काही शिकवून जातात. व्यवसाय, शिक्षण आणि जीवन शिक्षण या दोन्हींचा सुवर्णमध्य साधत जाणारी अशी ह्या सोनेरी कुटुंबाची वाटचाल!

- शमा पालकर

(साभार - स्पंदन, ऑगस्ट-ऑक्टोबर २०१० मधून)




**BOOK POST**

**If undelivered, please return to**

**संपादिका : ‘हितगुज’**
८/१३, सहकार नगर,
वडाळा,
मुंबई - ४०० ०३१

**मराठे परिवाराला नवीन वर्ष सुखसमृद्धीचे व समाधानाचे, उत्तम आरोग्याचे आणि भरभराटीचे जावो, ह्या शुभेच्छा!**

त्रैमासिक ‘हितगुज’ हे मराठे प्रतिष्ठान, मराठे उद्योग भवन, आप्पासाहेब मराठे मार्ग, प्रभादेवी, मुंबई-४०००२५ या न्यासाचे मुखपत्र असून फक्त सभासदांसाठी वितरित होते.
पत्रव्यवहाराचा पत्ता : डॉ. सौ. सुमेधा प्र. मराठे, ८/१३, सहकार नगर, वडाळा, मुंबई-३१. दूरध्वनी : २४१५०८८९ ई-मेल: prabhakar_marathe@yahoo.com
ई-मेल : (१) sitaram_khambete@yahoo.com (२) maratheparivar@yahoo.co.in ⦿ वेबसाईट : www.marathepratishthan.org